CMYK




अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

**आयपीएल सामना क्र.१६**

DELHI CAPITALS Vs MUMBAI INDIANS

दिल्ली कॅपिटल्स
विरुद्ध मुंबई इंडियन्स

वेळ : सायं.७.३० वा.
स्थळ : अरुण जेठली स्टेडियम, दिल्ली

www.surajyadigital.com | मंगळवार, दि.११ एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १९२ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# राष्ट्रवादीचा राष्ट्रीय दर्जा रद्द

सुराज्य/मुंबई

**राष्ट्रीय राजकारणात नेहमीच केंद्रस्थानी राहणारे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राष्ट्रीय दर्जा निवडणूक आयोगाने सोमवारी रद्द केला. सन २०१४ नंतरच्या विविध निवडणुकांमधील पक्षाची कामगिरी विचारात घेऊन निवडणूक आयोगाने राष्ट्रवादीचा राष्ट्रीय दर्जा रद्द करण्याचा निर्णय घेतला असून राष्ट्रवादीसोबतच ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस आणि सीपीआय या पक्षांचाही राष्ट्रीय दर्जा रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे हे पक्ष आता प्रादेशिक पक्ष म्हणून ओळखले जाणार आहेत. याचवेळी कमी कालावधीमध्ये खूप मोठी राजकीय झेप घेणारे दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला मात्र राष्ट्रीय दर्जा मिळाला आहे.**



काँग्रेस पक्षात बंड करून १९९९ साली शरद पवार बाहेर पडले होते. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली होती. दि. १० जानेवारी २००० रोजी राष्ट्रवादी काँग्रेसला राष्ट्रीय पक्षाची मान्यता निवडणूक आयोगाने दिली होती. सन २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीपर्यंत हा दर्जा कायम राहिला. त्यानंतरच्या विविध निवडणुकांमध्ये राष्ट्रवादीची घसरण झाल्यामुळे निवडणूक आयोगाने राष्ट्रवादीला नोटिसा काढल्या होत्या. राष्ट्रवादीचा राष्ट्रीय दर्जा काढताना लोकसभा २०१९ चे नियम लक्षात घेतले आहेत. त्यानंतर ज्या ज्या राज्यात निवडणुका झाल्या आहेत; तेथील आकडेवारी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. अरुणाचलप्रदेश, गोवा, मणिपूर, मेघालय आणि नागालँड या राज्यातील राष्ट्रवादीचे अस्तित्व कमी झालेले आहे. राष्ट्रवादी पक्षासह तृणमूल काँग्रेस आणि सीपीआय पक्षाचा राष्ट्रीय दर्जा काढून घेतला आहे. अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा देण्यात आला आहे.

### सुनील तटकरे काय म्हणाले?



१५ दिवसांपूर्वी आम्ही आमचे म्हणणे निवडणूक आयोगासमोर मांडले होते. १९९९ पासून आमच्या पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला होता. त्यानंतरच्या सर्व लोकसभा निवडणुकांमध्ये राष्ट्रीय पक्षाचा दर्जा टिकवण्यासाठी जी काही मतांची बेरीज संबंध देशभरात मिळवावी लागते, ती टक्केवारी आम्हाला मिळाली होती. त्यानंतर निवडणूक आयोगाने आम्हाला स्पष्टीकरण मागितले होते. ते आम्ही दिले. त्यांनी घेतलेल्या निर्णयाचा तपशील घेऊन.जी काही कायदेशीर पावले उचलायची ती उचल.

- खा. सुनील तटकरे (राष्ट्रवादीचे नेते)

### राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता केव्हा मिळते?

१. विधानसभा किंवा लोकसभा निवडणुकीत त्या पक्षाला ४ किंवा जास्त राज्यांमध्ये वैध मतांपैकी कमीत कमी ६टक्के मते मिळाली पाहिजेत आणि लोकसभा निवडणुकीत कमीत कमी ४ जागा मिळाल्या पाहिजेत. किंवा
२. लोकसभा निवडणुकीत त्या पक्षाला एकूण जागांपैकी कमीत कमी २टक्के जागा मिळाल्या पाहिजेत आणि या जागा कमीत कमी ३ राज्यांमधून निवडून आल्या पाहिजेत. किंवा
३. त्या पक्षाला कमीत कमी ४ राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षाचा दर्जा मिळाला पाहिजे.

### प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता केव्हा मिळते?

१. विधानसभा निवडणुकीत त्या पक्षाला वैध मतांपैकी कमीत कमी ६टक्के मते आणि एकूण जागांपैकी कमीत कमी २ जागा मिळाल्या पाहिजेत. किंवा
२. लोकसभा निवडणुकीत त्या पक्षाला वैध मतांपैकी कमीत कमी ६ टक्के मते आणि एकूण जागांपैकी कमीत कमी १ जागा मिळाली पाहिजे. किंवा
३. विधानसभा निवडणुकीत त्या पक्षाला एकूण जागांपैकी कमीत कमी ३ टक्के जागा किंवा कमीत कमी ३ जागा मिळाल्या पाहिजेत. किंवा
४. लोकसभा निवडणुकीत त्या पक्षाला राज्यातील २५ जागांमागे १ जागा मिळाली पाहिजे. किंवा
५. विधानसभा किंवा लोकसभा निवडणुकीत त्या पक्षाला वैध मतांपैकी कमीत कमी ८ टक्के मते मिळाली पाहिजेत.

### पक्षाला राष्ट्रीय किंवा प्रादेशिक पक्षाचा दर्जा मिळाल्याचे फायदे

१) राखीव निवडणूक चिन्ह
२) पक्षाच्या कार्यालयासाठी अनुदानित दरामध्ये जमीन
३) दूरदर्शन आणि ऑल इंडिया रेडिओवर मोफत प्रक्षेपण
४) निवडणूक आयोगाकडून निवडणूक याद्यांचे मोफत वितरण

## उध्दव ठाकरेंनी सर्व सोडल्यामुळे आम्ही त्यांना सोडून दिले : केसरकर

सुराज्य/पंढरपूर



उध्दव ठाकरे यांनी शिवसेना प्रमुखांचे विचार सोडले, शिवसैनिक सोडले, आता तर महाविकास आघाडीच्या सभांमधून स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे फोटोही गायब झाले आहेत. त्यांनी सर्व सोडल्यामुळे आम्ही त्यांना सोडून दिले, असा टोला शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी पंढरीत लगावला.

पंढरीत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी आलेल्या केसरकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक, शिवसेना जिल्हासंपर्क प्रमुख शिवाजी सावंत आदी उपस्थित होते. शिवसेना नाव व चिन्ह मिळाल्यानंतर शिवसेना भवन, पक्षाची मालमत्ता देखील मिळावी अशी याचिका एका वकिलाने न्यायालयात दाखल केली आहे. यावर बोलताना केसरकर यांनी, आम्हाला शिवसेनेची कोणतीच मालमत्ता नको. सर्व काही मालमत्ता उध्दव ठाकरे यांनाच मिळू दे. आमच्याकडे स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आहेत, अशी भूमिका मांडली. आदित्य ठाकरे हे पूर्वी कार्यालयात देखील फिरकत नव्हते. आता दारोदार फिरून खोटे आरोप करीत आहेत. गोबेल्स नीतीचा वापर करून खोटे बोलत आहेत. यासाठी देखील त्यांनी प्रशिक्षण घेतले असून त्यांची एक टिम हे काम करीत असल्याचा आरोप केला.

राज्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असताना देखील मुख्यमंत्री व सर्व मंत्री अयोध्या दौऱ्यावर गेल्यामुळे विरोधकांनी टीका सुरू केली आहे. यावर केसरकर यांनी, मुख्यमंत्री हे स्वतः शेतात जाऊन पंचनामा करतात का असा प्रश्न केला. आम्ही दौऱ्यावर असलो तरी कृषी मंत्री राज्यातच होते. तसेच मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना सर्व सूचना केल्या होत्या. याबाबत तातडीने त्यांनी एक बैठक देखील केली होती, असे स्पष्टीकरण दिले. राज्यात येत्या जूनपासून नवीन शिक्षण धोरण राबविले जाणार असून याबाबत तयारी सुरू असल्याची माहिती केसरकर यांनी दिली.

यामध्ये प्रिप्रायमरी, प्रायमरी आदी टप्पे करण्यात आले आहेत. मात्र दहावी व बारावीचे बोर्ड कायम राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. खासगी शाळा ताब्यात घेण्याबाबतचा शासनाचा अद्याप निर्णय झाला नसला तरी एखाद्या संस्थेने तसा प्रस्ताव दिला तर विचार करू असे उत्तर दिले. केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी राज्यात शिक्षण मंत्री कोण आहेत असा प्रश्न केला होता. यावर केसरकर यांनी, राणे हे आमचे ज्येष्ठ नेते असून त्यांना काहीही बोलण्याचा अधिकार आहे, असा टोला लगावला.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर

सुराज्य/मुंबई

**न्यायालयीन कचाट्यात :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला होता. मात्र, त्यापूर्वी ९२ नगरपरिषदांच्या निवडणुका जाहीर झाल्याने, अनेकांनी यावर आक्षेप घेतला होता. ९२ नगरपरिषदांच्या निवडणुकांमध्येही हे आरक्षण लागू करावे, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. तसेच महाविकास आघाडीच्या काळात तयार करण्यात आलेली वॉर्डरचना बदलण्याचा निर्णय शिंदे सरकारने घेतला होता. या नव्या वॉर्ड रचनेलाही सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होत. दोन या गोष्टींमुळेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका कायदेशीर कचाट्यात अडकलेल्या आहेत.



गेल्या आठ महिन्यांपासून ओबीसींचे राजकीय आरक्षण आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसंदर्भात सुनावणी सातत्याने लांबणीवर पडत आहे.

सोमवारच्या कामकाजात या प्रकरणाचा समावेश करण्यात आला होता. हे प्रकरण कामकाजात ३९ नंबरवर सुनावणीसाठी ठेवण्यात आले होते. मात्र, न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी तीन आठवडे पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आता पावसाळ्यापूर्वी या निवडणुका होण्याची शक्यता दुरावली आहे. दरम्यान, या प्रकरणातील मुद्दे निश्चित करण्यासाठी सॉलिसिटर जनरल यांच्याबरोबर याचिकाकर्त्यांची बैठक होणार असल्याची माहिती आहे.

महत्त्वाचे म्हणजे, याच निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालय मागच्या मे महिन्यात खूप आग्रही होते. निवडणुका तातडीने व्हायला हव्यात, अगदी पावसाळ्यातही निवडणुका घ्यायला काय हरकत आहे? असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने विचारला होता.

## चिमणीच्या सुनावणीला चार महिने पूर्ण

### आयुक्तांचा निर्णय अद्यापही पेडींगच



सोलापूर : चिमणी सुनावणी पूर्ण होऊन चार महिन्यांचा कालावधी लोटला तरी पालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी अद्यापही निर्णय सुनावलेला नाही. पालकमंत्र्यांनी महापालिका स्तरावर आता या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. या संदर्भात आयुक्तांना सूचना दिल्या आहेत, असे सांगितले आहे.

तरी आयुक्तांकडून मात्र चालढकल होत असल्याचे दिसत आहे. श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या अनधिकृत चिमणीबाबत महापालिके वतीने नूतन आयुक्त शीतल तेली-उगले यांच्यासमोर चिमणीची अंतिम सुनावणी पूर्ण झाली. यावर अंतिम निर्णय लवकरच येईल असे वाटत होते. मात्र दोन महिन्यांचा कालावधी लोटला तरी आयुक्तांकडे कोणताही निर्णय आलेला नाही. याबाबत सोलापूर विकासमंचच्यावतीने वारंवार पाठपुरावाही सुरू आहे.नुकतेच शनिवारी पालकमंत्री विखे-पाटील यांनी महापालिका स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्तांना सूचना दिल्या आहेत. त्यापार्श्वभूमीवर सोमवारच्या जनता दरबारप्रसंगी सोलापूर विकासमंचचे केतन शहा यांनी आयुक्तांची भेट घेऊन चिमणी प्रकरणाचा निकाल लावण्याची विनंती केली. आयुक्तांनी तुमची विनंती मान्य केली, एवढेच उत्तर दिले. मात्र निर्णय कधी घेणार याबाबत मात्र त्यांनी बोलण्यास नकार दिला. त्यामुळे आता आयुक्तांकडूनच या निर्णयाबाबत चालढकल होत असल्याचे बोलले जात आहे.

बंगळुरुमध्ये पूरन-स्टॉयनिसचे वादळ

## रोमांचक सामन्यात लखनौचा शेवटच्या चेंडूवर विजय



बंगळुरु : निकोलस पूरन आणि मार्कस स्टॉयनिस यांच्या वादळी अर्धशतकाच्या बळावर लखनौने आरसीबीचा एका विकेटने पराभव केला. एम चिन्नास्वामी स्टेडिअमवर अखेरच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या सामन्यात लखनौने बाजी मारली. अखेरच्या षटकात लखनौला विजयासाठी अखेरच्या चेंडूवर एका धावेची गरज असताना बिश्नोई आणि आवेश यांनी लखनौला विजय मिळवून दिला. लखनौकडून १२ षटकार आणि १७ चौकार लगावण्यात आले. निकोलस पूरन याने १९ चेंडूत ६२ तर स्टॉयनिस याने ३० चेंडूत ६५ धावांची खेळी केली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



गॅस सबसिडी मीच नाकारली आहे !

| कल्याण |
| --- |
| 278-70-460 |

| मेन बाजार |
| --- |
| ----- |

# अबब.... कारखानदारांनी थकविले ६९१ कोटी

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर विभागातील एक दोन कारखान्यांची धुराडी सोडली तर सर्वच कारखान्यांच्या गळीत हंगामाची धुराडी थंडावली आहेत. हंगाम संपला तरी ही सोलापूर विभागातील ५० पैकी ३५ कारखान्यांनी ६९१.४३ कोटीची एफआरपी देण्यात हात आखडता घेऊन एफआरपी कायद्याची पायमल्ली करीत शेतकऱ्यांना वेठीस धरले आहे. यामध्ये सहकारी साखर कारखान्यांपेक्षा खाजगी कारखान्यांची थकबाकी अधिक आहे. कहर म्हणजे काही कारखान्यांनी चक्क डिसेंबरमधील ऊस बिले थकविली असून गळीत हंगामाच्या सुरुवातीपासून 'टार्गेट' पूर्ती करण्यासाठी धावपळ करणारे कारखानदार व 'एफआरपी आमच्या हक्काची ...नाही कुणाच्या बापाची' आणि धुराडी पेटू न देण्याच्या राणा भीमदेवी घोषणा देणाऱ्या शेतकऱ्यांच्या संघटना गप्प आहेत.यामध्ये आधीच मेटाकुटीला आलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीत आणत तो हेलपाटे मारून बेजार झाला आहे.**

### एफआरपी कायद्याची पायमल्ली; सहकारीपेक्षा खासगीची थकबाकी अधिक



सोलापूर विभागात गळितास प्रारंभ झाल्यानंतर कारखान्यांची धुराडी पेटली होती.त्यानंतर सर्वच कारखानदारांनी लाखोंचे गळीत करण्याचा संकल्प करीत टार्गेट पूर्ण करण्यासाठी तोडणी यंत्रणा उभी केली. विभागातील ५० कारखान्यांनी यंदा हंगाम घेतला. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील ३७ तर धाराशिव जिल्ह्यातील १३ कारखान्यांचा समावेश आहे.यामध्ये मार्च अखेर पर्यंतचे 'एफआरपी'चे बेसिक रिकव्हरी प्रमाणे ४४६७.६८ कोटी रुपये ऊस बिलाच्या स्वरूपात शेतकऱ्यांना मिळाले आहेत. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील कारखान्यांनी एफआरपीचे ३५१२.२५ कोटी तर धाराशिव जिल्ह्यातील कारखान्यांनी ९५५.४३ कोटी रुपये मार्च अखेर दिले आहेत. असे असले तरी सोलापूर जिल्ह्यातील २८ कारखान्यांकडे एफआरपीचे ६२१.८० तर धाराशिव जिल्ह्यातील ८ कारखान्याकडे ६९.६३ कोटी रुपये थकित आहेत. सीताराम महाराज, विठ्ठल साई,श्री शंकर, सिद्धनाथ या कारखान्यांचा मार्च अखेरचा एफआरपी अहवाल अद्याप साखर आयुक्तालयास प्राप्त झाला नाही.

**कारखानानिहाय मार्च अखेर थकीत एफआरपी (कोटीत) :** सोलापूर जिल्हा : सिध्देश्वर ३४.५८, संत दामाजी १.१९, श्री मकाई २६.३२, संत कुर्मादास ११.३०, लोकनेते २६.४२, सासवड माळी २२.७१, लोकमंगल ( बिबिदारफळ) १०.६३, लोकमंगल (भंडारकवठे) ४.१३ सिद्धनाथ ४८.८३, जकराया १३.६५ , इंद्रेश्वर १५.८३, भैरवनाथ (विहाळ) २९.२२, भैरवनाथ (लवंगी) ३०.८७, युटोपियन १९.८५, मातोश्री शुगर २३.६४, भैरवनाथ (आलेगाव) ३६.९२, बबनराव शिंदे ४.३६, ओंकार ०.५०, जयहिंद १२.४७, विठ्ठल रिफाईंड ८३.०७, आष्टी शुगर १७.४३,भीमा ५०.०४, सहकार शिरोमणी ४४.२५, सीताराम महाराज ९.१९, धाराशिव (सांगोला) १२.२२, श्री शंकर २३.२९, आवताडे शुगर १४.३८, येडेश्वरी २.६७

**शेतकरी वेठीस; एफआरपी कायद्याची पायमल्ली :** शेतकऱ्यांच्या उसाचे गाळप झाल्यानंतर १४ दिवसात एफआरपी देणे बंधनकारक आहे. मात्र अनेक कारखाने या नियमाला केराची टोपली दाखवतात.राज्य शासनाने साखर कारखान्याच्या त्या त्या हंगामातील साखर उताऱ्यानुसार एफआरपी देण्यासंदर्भात मागील वर्षी फेब्रुवारीमध्ये आदेश काढला होता.त्यानुसार उसाचे गाळप झाल्यानंतर बेसिक रिकव्हरी प्रमाणे पहिला हप्ता शेतकऱ्यांना द्यायचा. अनेक कारखाने थेट उसाच्या रसापासून 'बी'हेवी मोलॅसिस पासून इथेनॉल निर्मिती करत असल्याने उर्वरित रक्कम कारखाना बंद झाल्यावर १५ दिवसात वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटकडून अंतिम साखर उतारा निश्चित करून त्यानुसार शेतकऱ्यांना द्यावी, असे आदेशात म्हटले होते. परंतु सर्रास कारखाने या आदेशाची पायमल्ली करीत असल्याचे दिसून येते.

CMYK

# अमूल-नंदिनी संघर्ष

कर्नाटक विधान सभेच्या निवडणुकीसाठी सत्ताधारी भाजप आणि विरोधी काँग्रेस यांच्यात घमासान सुरू आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. राजकीय आरोप करण्यासाठी राजकीय पक्षांना काही मुद्दे लागत असतात. त्यातील काही मुद्दे हे आयतेच त्यांच्या हाती पडत असतात तर काही उकरून काढले जातात. गेल्या आठवड्यात 'अमूल'ने ट्वीट करून कर्नाटकमध्ये प्रवेश करत असल्याची घोषणा केली. त्यामुळे राजकीय वादाला आणखी एक निमित्त मिळाले. कर्नाटकमध्ये राजकीय पक्षांची उमेदवारांच्या याद्या ठरवण्याची, राजकीय नेत्यांची एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करण्याची लगबग सुरू असताना गेल्या आठवड्यात 'अमूल'ने ट्वीट करून कर्नाटकमध्ये प्रवेश करत असल्याची घोषणा का करावी? यामागे राजकीय डाव आहे तसेच अमूल या संस्थेला पाठबळ कुणाचे आहे हेही सर्वज्ञात आहे. 'नंदिनी' ही कर्नाटक दूध संघाचा प्रतिष्ठित नाममुद्रा आहे. त्याला आता अमूलच्या स्पर्धेचा सामना करावा लागणार आहे. यावरूनच गुजरातचे कर्नाटकवर अतिक्रमण असा आरोप करीत काँग्रेस आणि जनता दलाने भाजपची कोंडी करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. ऐन निवडणुकीच्या धामधुमीत अमूलच्या प्रवेशामुळे 'नंदिनी' नाममुद्रा धोक्यात आल्याची टीका काँग्रेस आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाने केली आहे, तर विरोधक या मुद्द्याचे राजकारण करत आहेत, अशी टीका मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी केली आहे. 'अमूलच्या मुद्द्यावर आमची भूमिका अगदी स्पष्ट आहे. नंदिनी हा राष्ट्रीय ब्रँड आहे. तो कर्नाटकपुरता मर्यादित नाही. आम्ही नंदिनी नाममुद्रा इतर राज्यांमध्येही लोकप्रिय केली आहे. भाजपच्या कार्यकाळात राज्यातील केवळ दूध उत्पादन वाढले असे नाही तर दूध उत्पादकांना प्रोत्साहनदेखील मिळाले आहे. तसेच आमच्या काळात कर्नाटक दूध संघाच्या अनेक मोठ्या डेअरी सुरू करण्यात आल्या आहेत,' असा दावा बोम्मई यांनी केला आहे. 'नंदिनी'साठी मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे, त्यामुळे ती लवकरच देशातील पहिल्या क्रमांकाची नाममुद्रा होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. काँग्रेसचे कर्नाटक प्रभारी रणदीप सुरजेवाला यांनी भाजपवर 'नंदिनी' विकण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला. 'कर्नाटक दूध संघ गुजरातच्या अमूलला विकण्याचे भाजपचे कारस्थान आता उघड झाले आहे. आधी अमित शहा त्याविषयी उघडपणे बोलले, आता केंद्रीय कृषी राज्यमंत्री शोभा करंदलजे यांनी त्याला पाठिंबा दिला. 'नंदिनीचे नुकसान, अमूलचा फायदा, बोम्मई सरकार निमूटपणे पाहत आहे. नंदिनी वाचवा, भाजपला पराभूत करा!' असे ट्वीट सुरजेवाला यांनी केले. त्यानंतर भाजपने काँग्रेसवर शाब्दिक हल्ला चढवला. 'अमूल म्हणजे भाजप आणि नंदिनी म्हणजे काँग्रेस असा अर्थ होतो का? तर, 'एक देश, एक अमूल, एक दूध आणि एक गुजरात हे केंद्र सरकारचे अधिकृत धोरण झाले आहे. त्यामुळे त्याच्या आधारे अमूल नंदिनीचा गळा आवळत आहे' अशा शब्दांमध्ये माजी मुख्यमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी भाजपवर टीका केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डिसेंबर २०२२ मध्ये मंड्या येथील कर्नाटक दूध संघाच्या मोठ्या डेअरीचे उद्घाटन केले होते. त्या वेळी त्यांनी अमूल आणि नंदिनी यांनी एकत्र यावे, असे उद्गार काढले होते, त्यावरून विरोधकांनी त्यांच्यावर टीका केली होती. अमूलचे दूध आणि अन्य पदार्थांवर कन्नडिगांनी बहिष्कार घालावा, असे आवाहन काँग्रेस नेते सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांनी केले आहे. एकूणच राज्यात निवडणुकीचा रंग गहिरा होत असताना, दुधाचे राजकारणही तापत चालले आहे. अमूल ही गुजरातची मोठी दूध संस्था आहे. तिने आपले जाळे साऱ्या देशात पसरवले आहे. क्वालिटी व मार्केटिंगमध्ये या संस्थेने कमांड निर्माण केली आहे.अमूलला भाजपचा आशीर्वाद आहे. अमूलला तिथे पाठवण्यामागे भाजपच असणार पण राजकारण सोडून द्या. व्यावहारिकदृष्ट्या अमूलला तिथे जायला कुणाची हरकत असता कामा नये. कारण उद्योगाचा विस्तार करण्याचा अधिकार कुठल्याही संस्थेला आहे. तेव्हा काँग्रेस व जेडीएस या पक्षांनी कांगावा करण्याची गरजच काय?अमूल आले तर त्याचा विचार नंदिनीने करावा. आज सर्वच क्षेत्रात स्पर्धा आहे.स्पर्धेला तोंड दिलेच पाहिजे. भाजपने यात गेम केली आहे.काँग्रेस व जेडीएसला कामालाही लावले. अमूल आता तिथे कितपत यशस्वी होते हेही येत्या काळात दिसून येईल. निवडणुकीत भाजप विरुद्ध काँग्रेस यांच्यात जसा लढा पहायला मिळेल तसा अमूल आणि नंदिनी यांच्यातही संघर्ष पहायला मिळेल.





जयंतीविशेष

# शिक्षणाचे महत्त्व जाणणारे समाजसुधारक

**दलितांचे कैवारी, आद्य समाजसुधारक, शिक्षणाचे महत्त्व जाणणारे, स्त्री शिक्षणाचे प्रणेते, शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडणारे महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्ह्यातील कटगुण येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. दुसरे बाजीराव पेशवे यांच्या काळात महात्मा फुले यांचे वडील व दोन चुलते हे शनिवारवाड्यात फुले पुरविण्याचे काम करीत असत. त्यामुळे त्यांचे मूळचे गोरे हे आडनाव बदलून त्यांना 'फुले' या नावाने सर्वजण संबोधू लागले. ज्योतिराव केवळ ९ महिन्याचे असताना त्यांची आई चिमणाबाई यांचे निधन झाले. जोतिबा तेरा वर्षांचे असतानाच त्यांचे सावित्रीबाई यांच्याशी लग्न झाले.**

- - - - - - - - - - - - - - - - - -

ज्योतिबांना त्यांच्या एका ब्राह्मण मित्राने त्याच्या लग्नाचे निमंत्रण दिले होते. म्हणून ते लग्नाच्या मिरवणुकीत सहभागी झाले होते. वरिष्ठ वर्गातील माणसाबरोबर एक कनिष्ठ वर्गातील माणूस चालतो आहे. हे त्या वरिष्ठ वर्गातील माणसाला खटकले. हे पाहिल्यावर लगेच त्या वरिष्ठ वर्गातील माणसाने ज्योतिबांना मिरवणुकीत पाठीमागून चालावयास सांगितले. त्यामुळे जोतिबांचे मन दुखावले, त्यांना रात्रभर झोप लागली नाही. या समाजातील जुन्या चालीरीती बंद करून नव्या सुधारित चालीरिती समाजात रूढ केल्या पाहिजेत. असे त्यांना मनोमन वाटू लागले. ही गुलामगिरी नष्ट झाली पाहिजे आणि ती आपणच नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. असे त्यांना मनोमन वाटू लागले.



त्या काळामध्ये शिक्षणाचे महत्त्व फारसे कोणाला समजत नव्हते. पूर्वी ऋषीमुनींच्या आश्रमात शिक्षणाची सोय असायची. पण ती फक्त पुरुषांसाठीच आणि ती पण उच्च वर्गातील मुलांसाठीच असायची. शिक्षणामुळे मनुष्य शहाणा होतो. समाजातील चालीरीती, चांगल्या वाईट गोष्टी, सर्वांना समान वागणूक मिळावी, यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून ही समज जनतेमध्ये रुजवायला हवी, जनतेला शिक्षण देऊन शहाणे करावे या दृष्टीने महात्मा फुलेंनी शाळा काढण्याचा निर्णय घेतला. उच्चवर्णीय मुलासाठी शाळा तर होत्याच, पण मुलींसाठी कुठे एकही शाळा नव्हती आणि तसेच ज्योतिरावांना स्त्री शिक्षणाची प्रेरणा त्यांची मावस बहीण यांच्याकडून मिळाली. बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातीभेद पाहून ही समाजातील परिस्थिती सुधारण्याचा ज्योतिबा यांनी निश्चय केला.

ज्योतिबांनी १८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठ येथील भिडे यांच्या वाड्यात महाराष्ट्रातील पहिली मुलींची शाळा काढली. पण मुलींच्या शाळेमध्ये मुलींना ज्योतिबा शाळा शिकवू लागले तर लोकांच्या मनात निराळाच संभ्रम निर्माण होईल आणि म्हणून या मुलींच्या शाळेमध्ये शिकवण्यास या शाळेतील शिक्षकेची जबाबदारी आपली पत्नी सावित्रीबाई यांच्यावर सोपवली.

ज्योतिबांनी प्रथम सावित्रीबाईंना शाळा शिकवून सक्षम केले व त्यानंतरच ही जबाबदारी त्यांनी सावित्रीबाई यांच्यावर सोपवली. पुढे यांचे काम पाहून फातिमाबी शेख यांनीही या मुलींच्या शाळेमध्ये शिकविण्याचा निर्णय घेतला. सावित्रीबाईंच्या सोबतीला फातिमाबी शेख या त्यांना त्यांच्या सावलीसारख्या उभ्या होत्या. त्यानंतर जोतिबांनी १८५१ मध्ये अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केली. त्यांचे शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे मंत्र सर्वांना परिचित आहेत.

**विद्ये विना मती गेली ।**
**मतीविना नीती गेली ।।**
**निती विना गती गेली ।**
**गती विना वित्त गेले ।।**
**वित्त विना क्षुद्र खचले ।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**

ज्योतिबांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून शेतकऱ्यांचे विदारक दृश्य आणि दारिद्र्याचे वास्तवतेचे वर्णन केले. अस्पृश्य समाजातील लोकांचे पाण्यासाठी अनेक हाल होत असत. १८६८ साली आपल्या घरातील हौद ज्योतिबांनी अस्पृश्यांसाठी खुला केला. जोतिबा फुले यांनी रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचे समाधी स्थान शोधून काढले. शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र, माणसांची पारख, सावधानता आणि दूरदृष्टी या गुणांमुळे शिवाजी राजा ज्योतिबा यांना आदर्शवत वाटत होते. २४ सप्टेंबर १८७३ रोजी त्यांनी आपल्या अनुयायासह सर्व जातीधर्मातील लोकांना समान हक्क मिळविण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सर्व जातीधर्माच्या लोकांनी एकत्र येऊन या वर्गाच्या उन्नतीसाठी काम करावे असे सर्वानुमते ठरले.

असे हे दलितांचे कैवारी, शिक्षणसम्राट महात्मा ज्योतिबा फुले हे २८ नोव्हेंबर १८९० रोजी पुणे येथे कायमचे विसावले. त्यांचा पुणे येथील गंज पेठेतील फुलेवाडा हा ऐतिहासिक वास्तू म्हणून महाराष्ट्र शासनाने जतन करून ठेवला आहे. महात्मा फुले यांना त्रिकाल विनम्र अभिवादन.

**- अनिल जाधव,बार्शी.**

- - - - - - - - - - - - - - - - - -

टुडेज् ब्लॉग

# विषामध्ये विरघळत चालले जीवन

**संगणक, मोबाईल फोन आणि इतर इलेक्ट्रॉनिक्सच्या वाढत्या वापरामुळे जागतिक स्तरावर ई-कचऱ्याचे प्रमाण खूपच वाढले आहे. ग्लोबल ई-वेस्ट स्टॅटिस्टिक्स पार्टनरशिप (जीईएसपी) नुसार, २०१९ पर्यंत गेल्या पाच वर्षांत त्यात २१% वाढ झाली आहे.**

**वाढती भेसळ :-** अन्न नियामकाने २०२१-२२ मध्ये १४४,३४५ नमुन्यांचे विश्लेषण केले, त्यापैकी ३२,९३४ एफएसएस कायदा, २००६ आणि नियमांनुसार विहित केलेल्या मानकांचे उल्लंघन करताना आढळले. भेसळयुक्त अन्न विषारी असते, ज्याचा थेट आरोग्यावर परिणाम होतो आणि मनुष्याला विकासासाठी आवश्यक योग्य पोषक तत्वांपासून वंचित ठेवले जाते. सर्वात वाईट गोष्ट अशी आहे की काही भेसळयुक्त अन्न हे जीवघेण्या रोगांचे स्त्रोत आहेत, ज्यामुळे अवेळी महागड्या आजाराने वेदनादायक मृत्यू होतो. वैद्यकीय विज्ञानाच्या जर्नलनुसार, दूषित अन्न आणि पाण्याच्या सेवनामुळे भारतात दरवर्षी सुमारे २ दशलक्ष मृत्यू होतात.

आज प्रदूषित हवा, पाणी, अन्न म्हणजे जीवनाच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या गोष्टीच निकृष्ट दर्जाच्या झाल्या आहेत, त्यामुळे आरोग्य चांगले कसे राखायचे, हा गंभीर प्रश्न आहे. ह्या समस्येकरिता सध्या आपली जीवनशैली सर्वाधिक जबाबदार आहे. आपल्या आरोग्यासाठी चांगले स्वास्थ्यवर्धक पदार्थ नाकारून आपण जिभेच्या चवींनुसारच पदार्थ निवडतो. चरबीयुक्त, पचनास जड, मसालेदार, तळलेले, गोड, खारट अशा पदार्थांना जास्त मागणी असते. आजच्या पिढीला बाहेरचे पदार्थ जसे जंक फूड, फास्ट फूड जास्त आवडतात त्यामुळे आता स्ट्रीट फूडचा ट्रेंड खूप वाढला आहे. प्रत्येकाला तयार उत्पादने हवी असतात, घरच्या घरी सुद्धा कष्ट व्हायला नको. जीवनशैलीनुसार आता लोक सहजपणे आजारांना बळी पडतात. आज कोणत्याही वयात, कोणीही कोणत्याही रोगाला बळी पडून आपला जीव गमावतो. हे का होत आहे ह्या समस्या कधी आपण लक्षात आणल्या आहे? याचे मुख्य कारण म्हणजे विषारी वातावरण आणि आपले अज्ञानपण. आधुनिकतेमुळे इतरांवरील आपले अवलंबित्व वाढले आहे, यांत्रिक साधनांशिवाय आपण आज जगू शकत नाही. खाद्यपदार्थ बनवण्यासाठी लागणारे पॅकेजिंग साहित्य अधिकाधिक बाहेरून खरेदी करायला आपल्याला आवडते, जेव्हा की हे साहित्य बनवताना त्या वस्तूंना अनेक प्रक्रियेतून जावे लागते. त्यामुळे त्यामध्ये अनेक रसायने आढळतात, ज्यामुळे त्या पदार्थातील मूलभूत पोषक घटक कमी होऊन शरीराला हानी पोहोचते. धान्य सुद्धा पॉलिश



करून विकत घेतले जाते. कारण ते धान्य दिसायला चमकदार दिसते. आज आपल्या जीवनात रसायनांचा वापर सर्वत्र उच्च पातळीवर आहे. शेतात रसायने, फळे पिकवायला व साठवणीत रसायने, खाण्यापिण्याचा पदार्थात म्हणजे सगळीकडे रसायनांचा वापर दिसतोय. भेसळ इतकी सर्रास आहे की कोणत्याही अन्नपदार्थाच्या शुद्धतेची हमी देणे कठीण आहे.

**जागरुकता आणि सावधगिरी आवश्यक :-** पॅकेज केलेले पदार्थ, शीतपेये, फास्ट फूड आणि प्रक्रिया केलेले अन्न यांचे सेवन कमी करा. उच्च-फ्रुक्टोज कॉर्न सिरप, कृत्रिम स्वीटनर्स, ट्रान्स फॅट, कृत्रिम अन्न रंग, मोनोसोडियम ग्लूटामेट, सोडियम नायट्रेट, परक्लोरेट, फॅथलेट्स, बिस्फेनॉल्स, बीपीए, सोडियम बेंझोएट आणि पोटॅशियम बेंझोएट, ब्यूटिसाइलेटेड असे पदार्थ विविध खाद्यपदार्थांमध्ये मिसळले जातात, जे आरोग्याच्या दृष्टीकोनातून हानिकारक असतात. अशा गोष्टी नेहमी टाळल्या पाहिजेत. उष्णतेमुळे बीपीए आणि थैलेट प्लॅस्टिकमधून अन्नामध्ये प्रवेश करू शकतात, त्यामुळे प्लास्टिकच्या कंटेनरमध्ये अन्न किंवा पेये साठवणे टाळा. प्लास्टिक ऐवजी काच आणि स्टेनलेस स्टीलचा वापर करा. अन्न हाताळण्यापूर्वी आणि नंतर हात चांगले धुवा आणि सर्व फळे आणि भाज्या पूर्णपणे स्वच्छ करा.


आरोग्य हीच संपत्ती आहे, चांगल्या आरोग्यासाठी जागरूकता आणि जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. निरोगी शरीरासाठी, देखावा आणि आधुनिक जीवनशैली सोडून देणेच चांगले. आधुनिक विचारांनी बनावे. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सरकारी धोरण-नियम, सूचनांचे काटेकोर पालन व्हायला हवे. यांत्रिक साधनांचा मर्यादित वापर करा. जंगल समृद्ध करावे लागेल, जेणेकरून पर्यावरणाचे चक्र सुरळीत चालेल, ज्यामुळे जलस्रोत समृद्ध होतील, आपल्याला शुद्ध प्राणवायू मिळेल, ग्लोबल वॉर्मिंगच्या समस्येत सुधारणा होऊन चांगली पिके मिळतील, नैसर्गिक आपत्ती आणि रोगांमध्ये घट होईल. वन हा जीवनाचा आधार आहे, वृक्ष लागवडीला सातत्याने प्रोत्साहन देणे ही प्रत्येक मानवाची जबाबदारी आहे.

(उत्तरार्ध)

**- डॉ. प्रितम गेडाम,नागपूर**

जन्म हा अखेरचा

# कायानुग्रहस्थल - २



शरीरापेक्षा भिन्न असलेल्या वस्तूला काही झाल्यावर जर तुम्हाला त्रास होत असेल तर त्या वस्तूविषयी तुम्हाला अभिमान आहे, असे निश्चित समजावे. शहरात अनेक लोक मरत असतात. परंतु त्यामुळे शहरातील सर्व नागरिक रडत नाहीत. ज्यांच्या घरी मृत्यू होतो, तेच फक्त रडतात. शेजारीपाजारी त्यांचे सांत्वन करायला जातात आणि थोडे रडून येतात. ते कशासाठी? तर आपल्या घरी मृत्यू झाल्यावर हे लोक येऊन रडले होते म्हणून. ही एक प्रकारे रडण्याची परतफेडच असते. आपण यावेळी रडलो नाहीं तर लोक काय म्हणतील, या काळजीने लोक रडत असतात. ही सामान्य माणसांची कथा आहे. दुःख पाहून योग्याच्या डोळ्यांत देखील अश्रू येतात. परंतु ते सामान्य माणसांसारखे नसतात. योग्याच्या चेहऱ्यावर देखील कधीकधी क्रोधादी विकार उमटलेले दिसतील. परंतु त्यामुळे योगी लिप्त होत नसतो, शरीराचे विकार त्याला स्पर्शत नसतात. शरीर मलकोष असल्यामुळे अपवित्र भासते. शरीर मलीन असले तरी आत्मा मलीन नसतो. शिवयोगी आत्मरुपात रममाण असल्यामुळे शरीरदोषांपासून मुक्त, अलिप्त असतो. गीतेत स्थितप्रज्ञाची लक्षणे वर्णिली आहेत. तो कसा बोलतो, कसा चालतो, कसा खातो, पितो इ. त्याचा आदर्श समाजापुढे ठेवून माणसांनी स्थितप्रज्ञ व्हावे, असा बोध गीतेने केला आहे. श्रेष्ठाचा आधार पाहून त्याप्रमाणे आपले आचरण बदलणे हाच शिष्टाचार होय.

**शिवभावनया युक्तः स्थिरया निर्विकल्पया । शिवो भवति निर्धूतमायावेशपरिप्लवः ।। (१७.८)**

जीव शिव कसा झाला, याविषयी येथे सांगितले आहे. जोपर्यंत मनुष्याच्या मनात शिवभावनेचा उदय होत नाही, तोपर्यंत तो शिव किंवा शिवयोगी होऊ शकत नाही. मानवी जीवनात भावनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जीवनातून भावना वगळली तर जीवन झाडा-झुडुपासारखे होईल.

**(क्रमशः) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# महात्मा फुले महान समाजसुधारक...

महात्मा जोतिबा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्ह्यातील कटगुण या गावी झाला. जन्मताच समाजसुधारणेची तळमळ त्यांच्यामध्ये होती. त्यामुळे आज संपूर्ण भारतात महात्मा फुले यांना समाजसुधारक म्हणून मोठ्या आदरतिथ्याने ओळखले जाते. महात्मा फुले कर्तृत्ववान महापुरुष होते. त्यामुळेच त्यांच्यात आपल्याला समाज सुधारणेचे संपूर्ण गुण पहायला मिळतात. महात्मा फुले सामाजिक प्रबोधनकार, भारतीय सामाजिक कार्यकर्ते, महान विचारवंत, समाजसुधारक, उत्कृष्ट लेखन, स्त्रियांना व समाजातील लोकांना शिक्षित करणे, जातीय व्यवस्थेचे निर्मूलन इत्यादी अनेक महान कार्याने आज महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात मोठ्या सन्मानाने महात्मा फुलेंना ओळखले जाते. त्यामुळेच आज संपूर्ण भारत त्यांच्या कार्यापुढे नतमस्तक होतो. आज महाराष्ट्रात शिक्षणामध्ये जी काही सुधारणा, आमूलाग्र बदल व विविधता दिसून येते. त्यांचे संपूर्ण श्रेय महात्मा ज्योतिबा फुलेंना व सावित्रीबाई फुलेंना जाते. महात्मा जोतिबा फुले यांचे एवढे महान कार्य आहे की महाराष्ट्रासह संपूर्ण भारत कधीच विसरणार नाही. कारण सन १८६९ साली महात्मा जोतिबा फुले यांनी रायगडावरील शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली व त्यांच्या जीवनावर सर्वप्रथम पोवाडा लिहिला. शिवाजी महाराजांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचावे यासाठी फुलेंनी सन १८७० साली शिवजयंतीची सुरूवात केली. अशा क्रांतिकारक महान समाजसुधारक ज्योतिबा फुलेंना कोटी कोटी प्रणाम. महात्मा फुलेंच्या जयंती निमित्त महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे. कारण आज समाज अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करीत आहे. परंतु दिवसेंदिवस निसर्गाचा ह्रास होत आहे. त्याला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. त्यामुळे जयंतीनिमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होणे अत्यंत गरजेचे आहे. यातच आपल्याला म. ज्योतिबा फुले यांचे आचार-विचार अवश्य दिसून येईल व प्रत्येक झाडाच्या पानात, फळात, फुलात महात्मा फुलेंचे दर्शन अवश्य होईल.

**- रमेश लांजेवार, नागपूर.**

# विरोधकांचे लक्ष कारस्थानावर...

**मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री नॉट रिचेबल झाले असते तर कुणाची अडचण नव्हती. देवाच्या कामाला उघड जातात. रामनामाचा गजर करत जातात. शेतकऱ्यांना मदत करतात. पण त्याला अयोध्येचा आशीर्वाद असावा म्हणून रघुरामाच्या चरणी प्रार्थना करतात. हे अजितदादांना चांगले वाटत नाही. दर्शनाला जाण्यापेक्षा सीएम, डीसीएम नॉटरिचेबल झाले असते किंवा गायब झाले असते तर अजितदादांची अडचण नव्हती किंवा त्यापेक्षाही अजितदादांसारखे पळून गेले असते तर विरोधीपक्ष नेत्यांनी स्वागत केले असते.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - -

पत्राचाळ गृहनिर्माणाचे भानगडीमालक पिसाळल्यासारखे बोलतात. कारण 'बाळवत्यात बिघडलेत- ताटीवरच सुधारणार' असे लोक म्हणतात. सर्वपक्षीय नेता म्हणून सर्वच पक्षाचा एजंट म्हणून मनगटावर तेल ओततात. काहीही बरळत असतात. त्यांना कोण आवरणार? अरविंद सावंत, भास्कर जाधव, विनायक राऊत, चंद्रकांत खैरे ही माणसं वार लावून ओरडत असतात. कारण नेता मातोश्रीचा उंबरठा ओलांडत नव्हता. तेवढे निमित्त करून राऊत बंधूच राज्यातली आणि केंद्रातली विरोधी पक्षाच्या वाट्याला आलेली सगळी सत्ता पुजारी समजून वाटून खात होते. कारण विरोधकांचे लक्ष शेतकरी हिताकडे नसून सगळे लक्ष सत्तेकडे आहे. सत्तेची सवय झालेले 'आपण सगळे भाऊ मिळेल ते वाटून खाऊ' म्हणत सगळे लाभ उठवत होते.

कधी आयुष्यात हाफशाला पाणी लागलंय का? दिवाळीचा आनंदशिधा मिळाला का? मुद्रा योजनेची कर्ज प्राप्त झाले का? आयुष्यात कधी चौकशी केली नाही. परंतु चोवीस वर्षे राज्यसभेच्या दरबारी थाटात खा. राऊत शिव्या देत फिरत असतात. काही माणसं बाळवत्यात बिघडलेली असतात. ती डायरेक्ट ताटीवर सुधारतात, असा आरोप चळवळीतल्या माणसांचा असतो.

धर्माच्या नावाखाली राजकीय पर्यटनाचे सर्वपक्षीय दलाल खासदार राऊतांनी दरबारी थाटात म्हटले आहे.



तर आमची श्रद्धा शेतकऱ्यांवर त्यांची श्रद्धा अयोध्येत असे विरोधकाने म्हटले आहे, अर्थात विरोधकांची श्रद्धा सत्तेवर असून आमची श्रद्धा धर्मावर आणि शेतीवर आहे. विरोधक जर अयोध्येला आले तर अयोध्येच्या रघुरामाकडे 'आमच्या पापाचे धनी सोडवा' अशी प्रार्थना करावी लागेल. तर पत्राचाळ गृहनिर्माणमध्ये अडकलेला दलाल राऊत सोडवा, असं सांगावे लागेल. आदिवासींच्या जमिनी हडप करणारे जमीनमाफियांना संरक्षित करा अशी प्रार्थना शरयू नदीकडे करावी लागेल म्हणून विरोधक अयोध्येला जाणे टाळतात. काही विशिष्ट धर्माची मतं कमी होतील म्हणून विरोधक घाबरतात. सात्त्विक देवतांचे दर्शन घेणे टाळतात. मतदारांना बरे वाटावे म्हणून निवडणुकीमध्ये देवतांचे दर्शन घेत असतात. नक्की नाटक कुणाचे हे मराठी मुलखाला चांगले माहीत आहे. विशिष्ट लोकांना बरे वाटावे म्हणून प्रभू रामचंद्राच्या जन्माचे पुरावे मागणारे भ्रष्ट नेते देवाने सत्तेबाहेर ठेवले आहेत. तर शेतकऱ्यांचा पुळका दाखविणारे मतलबी नेत्यांनी अडीच वर्ष पूरग्रस्ताकडे ढुंकूनही पाहिले नव्हते. केवळ सत्तेच्या चांगल्या कामावर तोंडसुख घेण्यापेक्षा कधी लोकहिताची सेवा पाहून विरोधकांनी कौतुक करावे असे आता चांगुलपण उरलेच नाही. सत्तेवाचून तडफडाट, सत्तेवर व्यक्त होणारा जळफळाट याची वाचकांना, टीव्ही रसिकांना किळस येते, वीट येतो. तरी ठाकरे परिवारातील बाप-लेक सतत आरोप करत असतात. प्रथम कल्याण राष्ट्राचे मग समाजाचे नंतर उर्वरित कुटुंबांचे. ही भूमिका असली पाहिजे, पण तसे घडत नाही. परंतु मातोश्रींचा जळफळाट व्यक्त होताना त्याला उत्तर देण्याकडेही दुर्लक्ष होते. विकास कामात गुंतलेले डबल इंजीन फालतू गोष्टींकडे दुर्लक्ष करते. यातच भाजपच्या विस्ताराचे हित आहे. कारण पक्ष कार्यकर्त्यांच्या मालकीचा असल्यामुळे न बोलता राष्ट्राच्या विकासकामावर कार्यकर्त्यांचे लक्ष असते.

**- प्रा. लक्ष्मण ढोबळे,**
माजी मंत्री व कार्यकारणी सदस्य भाजप.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# कृषी यांत्रिकीकरण योजनेतून जिल्ह्यातील ५ हजार शेतकऱ्यांना ३६.५० कोटींचा निधी

## जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे यांची माहिती

✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूर जिल्हामध्ये कृषि यांत्रिकीकरण योजनेतून ५ हजार २४२ शेतकऱ्यांना विविध अवजारे व यंत्रांसाठी ३६ कोटी ५१ लाख, ८६ हजार १८३ रुपये अनुदान वितरीत करण्यात आल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी बाळासाहेब शिंदे यांनी ही माहिती दिली.**

राज्यात कृषी यांत्रिकिकरण योजना राबविण्यात येत आहे. या अंतर्गत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, पौष्टिक तृणधान्य, राष अन्न सुरक्षा अभियान - गळीत धान्य, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कडधान्ये, राष्ट्रीय कृषी विकास योजना - कृषी यांत्रिकिकरण, राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकिकरण, कृषी यांत्रिकिकरण उपअभियान अंतर्गत विविध साधनांचा पुरवठा करण्यात येत आहे. या योजने अंतर्गत कृषी यांत्रिकिकरण योजनेतून आत्तापर्यंत ९ हजार ३९६ शेतकऱ्यांना पूर्वसंमती देण्यात आली होती. त्यापैकी ७ हजार ३४६ शेतकऱ्यांनी अवजारे, यंत्रे खरेदीची बिले ऑनलाईन सादर केली आहेत. ३१ मार्चपर्यंत त्यापैकी ५ हजार २४२ शेतकऱ्यांच्या बिलाची पडताळणी होऊन त्यांना ३६ कोटी ५१ लाख ८६ हजार १८३ रुपये अनुदान वितरित करण्यात आले आहे. उर्वरित बिलांची पडताळणी व अनुदान वितरणाची प्रक्रिया प्रगतिपथावर आहे.

### यासाठी मिळकते अनुदान

कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या कृषी यांत्रिकीकरण योजनेतून ट्रॅक्टर, पॉवर टिलर, स्वयंचलित यंत्रे व अवजारे, प्रक्रिया युनिटस् इत्यादी बाबींसाठी अनुदान दिले जाते. ट्रॅक्टरसाठी एक लाख ते सव्वा लाख रुपये, तसेच इतर बाबीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प किंवा अत्यल्प भूधारक व महिला शेतकरी यांना ५० टक्के, तर इतर शेतकऱ्यांना ४० टक्के किंवा मंजूर कमाल मर्यादा यापैकी जे कमी असेल इतके अनुदान दिले जाते.

### असे आहेत निकष

अवजारे खरेदीकरिता पूर्वसंमती मिळाल्यानंतर अवजारे, यंत्राची खुल्या बाजारातून खरेदी करताना स्वतःच्या बँक खात्यातून रोखरहित (कॅशलेश) पद्धतीने व्यवहार करणे बंधनकारक आहे. खरेदी करावयाची अवजारे बीआयएस अथवा अन्य सक्षम संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार, तांत्रिक निकषांनुसार असल्याचे प्रमाणित केलेली असावीत. अवजारे खरेदीसाठी पूर्वसमती मिळाल्यानंतर एक महिन्याच्या आत देयक ऑनलाईन स्वरूपात महाडीबीटी पोर्टलवर सादर करणे आवश्यक आहे.

### तालुका निहाय वितरण झालेले अनुदान

- उत्तर सोलापूर (२२९ शेतकऱ्यांना ८८ लाख ७७ हजार ४२ रुपये)
- दक्षिण सोलापूर (२७७ शेतकऱ्यांना १ कोटी ८६ लाख ६३ हजार ६६१ रुपये)
- मोहोळ (५२५ शेतकऱ्यांना ३ कोटी ६६ लाख ६२ हजार २५९ रुपये)
- अक्कलकोट (२८२ शेतकऱ्यांना २ कोटी ३६ लाख ९५ हजार ३३२ रुपये)
- बार्शी (५५३ शेतकऱ्यांना ४ कोटी ५४ लाख २९ हजार ३८१ रुपये,
- माढा (६१९ शेतकऱ्यांना ४ कोटी ८२ लाख ४७ हजार ६३० रुपये)
- करमाळा (२२१ शेतकऱ्यांना ४ कोटी ६२ लाख २० हजार ७७९ रुपये)
- पंढरपूर (५२४ शेतकऱ्यांना ३ कोटी ४७ लाख ४९ हजार रुपये)
- सांगोला (६७० शेतकऱ्यांना ३ कोटी ९९ लाख ८७ हजार २५३ रुपये
- मंगळवेढा (५७३ शेतकऱ्यांना ३ कोटी ८२ लाख १२ हजार ६६८ रुपये
- माळशिरस (३६९ शेतकऱ्यांना २ कोटी ४४ लाख ४१ हजार १६६ रुपये)



## प्रलंबित मागण्यांबाबत निर्णय घ्यावा अन्यथा धरणे आंदोलन

### महापालिका कामगार संघटना कृती समितीचा इशारा

✔ **सोलापूर** : प्रलंबित मागण्यांबाबत तातडीने निर्णय घ्यावा अन्यथा धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने कामगार नेते अशोक जानराव यांनी दिला आहे. प्रशासक म्हणून रुजू झाल्यापासून कामगारांच्या मागण्या सोडविण्यासाठी कृति समिती बरोबर अद्याप एकही बैठक घेतलेली नाही. त्यामुळे कामगार कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. कामगारात असंतोष निर्माण झालेला आहे. तेव्हा कामगारांच्या प्रलंबित मागण्याबाबत तात्काळ निर्णय व्हावा, असे कृती समितीच्या वतीने महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. सेवानिवृत्त सेवकांच्या उर्वरित पाल्यांना सेवेत सामावून घ्यावे, लाड कमिटीतील पाच प्रलंबित वारसांना तात्काळ सेवेत घ्यावे, ६ एप्रिल १९९५ पूर्वीच्या रोजंदारी चावीवाल्यांना शासनाच्या आदेशाप्रमाणे सेवेत तात्काळ कायम करावे, ५७२ च्या टप्यात सेवेत कायम होवून सेवानिवृत्त झालेला सेवानिवृत्तांना शासनाच्या मंजूर पत्राप्रमाणे पेन्शन द्यावी, सणासाठी महागाई भत्त्याचा फरक द्यावा, राज्य शासनाने सन २०२३च्या पदभरती करताना आस्थापना खर्चाच्या ३५ टक्के मर्यादेची अट शिथील केल्याने महापालिकेमध्ये मंजूर आकृतिबंधातील ३४० पदे भरताना १० ते १५ वर्षापासून कंत्राटी, मानधनावर काम करीत आहेत त्यांना प्रथम प्राधान्याने सेवेत कायम करावे, बालवाडी शिक्षीका, सेविकांना महापालिका ठरावा प्रमाणे निरंतर मुदतवाढ व्हावी यासह इतर मागण्याबाबत निर्णय व्हावा आदी मागण्यांबाबत निर्णय घेण्याची मागणी कृती समितीने केली आहे. यावेळी शशिकांत शिरसट, आसंग कांबळे, श्रीनिवास कांबळे, मलकारी कोरे, बाळू ऐवळे, लक्ष्मण अरवत, रोहन लोंढे, भारत क्षीरसागर आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.



## बाळासाहेब कर्चे यांची तलाठीपदी निवड, पत्रकारांच्यावतीने सन्मान

✔ **नातेपुते** : पिंपरी (ता. माळशिरस) येथील पत्रकार सामाजिक कार्याची आवड असणारे सांप्रदायिक कार्यात हिरारीने भाग घेणारे पिंपरी गावचे सुपुत्र बाळासाहेब एकनाथ कर्चे यांची नुकतीच सातारा जिल्ह्यातील जावली तालुक्यात तलाठी म्हणून नियुक्ती झाली असल्याने नातेपुते येथील ऑल जर्नालिस्ट अँड फ्रेंड सर्कल माळशिरस तालुका या राष्ट्रीय पत्रकार संघटना व पत्रकार यांच्या वतीने पत्रकार तथा तलाटी बाळासाहेब कर्चे यांचा फेटा, शाल, हार देऊन सन्मान करण्यात आला यावेळी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष पत्रकार श्रीकांत बाविस्कर, माळशिरस तालुकाध्यक्ष शोभा वाघमोडे, तालुका पत्रकार संघटनेचे पदाधिकारी भोसले, हनुमंत माने, संजय पवार, विनायक सावंत, सुनील ढोबळे, वैभव आठवले पत्रकार मनोज राऊत आधी पत्रकार बांधव उपस्थित होते. यावेळी बाळासाहेब कर्चे बोलत असताना म्हणाले की, गेल्या पंचवीस वर्षापासून पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक नामांकित दैनिकात काम करून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्षेत्रातील लोकांना लेखणीच्या माध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न केला. जावली तालुका सातारा येथे तलाठी म्हणून नियुक्ती झाली आहे लोकांच्या काय अडचणी असतात हे मी जवळून पाहिले आहे मी तलाठी म्हणून माझ्या प्रति लोकांची कामे पूर्णपणे विश्वासाने करून याही क्षेत्रात लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न करीन यावेळी पत्रकार श्रीकांत बाविस्कर, मनोज राऊत, विलास भोसले, विनायक सावंत, सुनील ढोबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## डॉ.शिंदे यांच्या 'अंत:स्थ हुंकार'ला साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार



✔ **सोलापूर** : मातंग साहित्य परिषद, पुणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्र व समरसता साहित्य, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने वतीने देण्यात येणारा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात सहायक कुलसचिव म्हणून कार्यरत असलेले डॉ.शिवाजी शिंदे यांच्या अंतःस्थ हुंकार या काव्यसंग्रहाला जाहीर झाला आहे.

पुरस्काराचे वितरण दिनांक ११ फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी ३ : ०० वाजता संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा.ना. रामदासजी आठवले यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. मा.डॉ.कारभारी काळे, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. यावेळी मा.आमदार सुनील कांबळे, मा.प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

डॉ.शिवाजी शिंदे यांच्या पहिल्या 'कैवार' या काव्यसंग्रहाला एकूण ३४ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना एकूण १७ पुरस्कार मिळाले आहेत. दोन्ही मिळून त्यांना आजवर एकूण ५१ पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

त्यांना मिळालेल्या या प्रतिष्ठेच्या पुरस्काराबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, प्रा.कुलगुरू डॉ. राजेश गादेवार, आयक्युएसीचे संचालक प्रा.डॉ.विकास पाटील, कुलसचिव योगिनी घारे मॅडम, सर्व संवैधानिक अधिकारी, संकुल संचालक, शिक्षकवृंद, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी डॉ. शिवाजी शिंदे यांचे अभिनंदन केले.

## कायद्याच्या चौकटीत राहून डॉल्बी लावा : पोलीस आयुक्त

✔ सुराज्य/सोलापूर




१४ एप्रिलपासून सोलापूर शहर जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी होत असून २३ एप्रिल रोजी शहरात मिरवणूक निघणार आहे.या मिरवणूका शांततेत पार पाडल्या पाहिजेत. या जयंतीच्या माध्यमातून सामाजिक एकोपा जपला पाहिजे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये. कायदा सुव्यवस्था बिघडणार नाही याची दक्षता घेत कायद्याच्या चौकटीत राहून डॉल्बी लावावा.असे आवाहन पोलीस आयुक्त डॉ.राजेंद्र माने यांनी केले.

पोलिस आयुक्त कार्यालयात शांतता कमिटी सदस्य, विविध मंडळे, लोकप्रतिनिधी यांची संयुक्ति बैठक घेण्यात आली होती. या बैठकीस सोलापूर महानगरपालिकेचे अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, विद्युत वितरण विभागाचे अधिकारी, शहर पोलिस आयुक्तालयातील पोलीस उपायुक्त,सहा.पोलीस आयुक्त व सातही पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक उपस्थित होते. या बैठकीत जयंतीच्या अनुषंगाने विविध विषयांवर प्रातिनिधीक स्वरुपात चर्चा करण्यात आली.डॉल्बी लावण्यास विरोध नाही मात्र डॉल्बीचा ध्वनीक्षेपाचा आवाज हि दिलेल्या डिसेबलच्या मर्यादेत असावा. जी मंडळे कायद्याचे उल्लंघन करतील अशा मंडळांवर गुन्हे दाखल केले जातील असा सूचना देण्यात आल्या.या बैठकीस भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती मंडळाचे सर्व विश्वस्त पदाधिकारी सुभानजी बनसोडे, राजाभाऊ सरवदे,राजाभाऊ इंगळे, सुबोध वाघमोडे, राहुल सरवदे, ॲड.संजीव सदाफुले, विशाखा उबाळे, अजित गायकवाड, पिंटू डावरे,के. डी कांबळे, युवराज पवार,सुशील सरवदे, शशी बापू कांबळे, याशिवाय बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती मंडळाचे नवनियुक्त अध्यक्ष सुहास सावंत यांच्यासह आनंद चंदनशिवे, बाळासाहेब वाघमारे,रॉकी बंगाळे, फिरोज पठाण, शांतीकुमार नागटिळक, विजयानंद उघडे, केरु जाधव, पप्पू गायकवाड यांच्यासह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

## किराणा दुकानाचे शटर उचकटून दोन लाखांची रक्कम पळवली

✔ **सोलापूर** : एस.एन सालार किराणा भुसार या किराणा दुकान गाळा नं.२ चे अज्ञात चोरट्याने शटर उचकटून दुकानात असलेले सेफचे लॉक उचकटून त्यामध्ये असलेले दोन लाखांची रक्कम चोरून नेली आहे. ही घटना दि.९ ते १० एप्रिल दरम्यान घडली.याप्रकरणी नदीम बिलाल अहेमद सालार (वय-२२,रा.जोडभावी पेठ,चाटला साडी सेंटर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पाच अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.तपास सहा. पोलीस निरीक्षक पवार हे करीत आहेत.

## धडकेत पादचारी जखमी

✔ **सोलापूर** : जुना विडी घरकुल येथील सर्विस रोडवरून चालत जात असताना अज्ञात वाहनाने धडक दिल्याने श्रीनिवास पुंडलिक वंगरी (वय ५३, रा. जुना विडी घरकुल) हे जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## दोन ॲपे रिक्षा चालकांवर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील ९ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजता चेतन हॉटेल ते नीलमनगर या सार्वजनिक रस्त्यावर पे रिक्षा क्रमांक एम.एच.१३.सीटी.८३१२ ही रिक्षा रस्त्याच्या मध्ये थांबून येणारा जाणारा लोकांना अडथळा निर्माण करीत असताना मिळून आली आहे.

याप्रकरणी पोलीस शिपाई अश्रुभान सुरेश दुधाळ यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून जब्बार बाबू जमादार (वय-४०, रा.नवीन विडी घरकुल) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.तर दुसरी पे रिक्षा क्र.एम.एच.१३. सीटी.९३७१ यामधील चालक रमेश कल्लाप्पा ढमे (वय-३०, रा.नवीन विडी घरकुल) याने सार्वजनिक रस्त्यांवर रिक्षा उभी करून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात ढमे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.


### नावात बदल

माझे **जुने नाव भारती जगदीश दिड्डी** असे होते. ते आता बदलून **नवीन नाव बालमणी जगदीश दिड्डी** असे झाले आहे. तरी संबंधितांनी मला माझ्या **नवीन बालमणी जगदीश दिड्डी** याच नावाने ओळखण्यात यावे. पत्ता : फ्लॅट नं.२, भूदेवी टॉवर, अशोक चौक, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर-४१३००६
अफि.नं.०४/३०८३,दि.१०/४/२०२३

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
पत्ता- इंद्रभुवन पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१.
नगर अभियंता कार्यालय, रस्ते विभाग -
email - smcaeroad@gmail.com मो.9423992596

जा.क्र.नगर अभियंता/रस्ते विभाग/२०२२-२३ दि.१०/०४/२०२३

**जाहीर टेंडर नोटीस**

या विभागाकडून केंद्र शासन पुरस्कृत NCAP योजनेअंतर्गत विविध ठिकाणी रस्ते दुभाजक सुधारणा करणेकरिता Tender ID - 2023_SMC_892126_1 या विकास कामाचे निविदा प्रसिद्ध करण्यात आले आहे.

सदर कामाचा तपशील www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.११/०४/२०२३ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
प्र.नगर अभियंता
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर


जा.क्र.कृउबासदु/गाळे लिलाव/११/२०२३
कृषि उत्पन्न बाजार समिती दुधनी
दि.१०/०४/२०२३

### जाहीर लिलाव सूचना

**कृषि उत्पन्न बाजार समिती दुधनी ता.अक्कलकोट जि.सोलापूर**

कृषि उत्पन्न बाजार समिती दुधनी ता.अक्कलकोट जि.सोलापूर जाहीर प्रकटनद्वारे कळविण्यात येते की, श्री शांतलिंगेश्वर बाजार आवार दुधनी येथे रोड लगत व्यवसायासाठी गाळा क्र.१ ते १७ गाळ्याचे जाहीर लिलाव पद्धतीने बोली मागविण्यात येत आहे. व त्याचा सर्व तपशील कृषि उत्पन्न बाजार समिती दुधनी ता.अक्कलकोट जि.सोलापूर कार्यालयात दिनांक.११/०४/२०२३ ते १५/०४/२०२३ पर्यंत उपलब्ध आहे. तसेच बाजार समितीचे गाळे गाळप संबंधीत नियम, अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात व नोटीस बोर्डवर पाहावयाला मिळतील गाळे वाटप करण्याचे अथवा रद्द करण्याचे अधिकार, कृषि उत्पन्न बाजार समिती दुधनी यांनी राखून ठेवले आहे.

सही/-
प्रशासक
कृषि उत्पन्न बाजार समिती दुधनी






## सांस्कृतिक मंत्री मुनगंटीवार यांच्या हस्ते गायक मोहंम्मद अयाज यांचा सन्मान

**सोलापूर** : नुकतेच सोलापूरचे गायक व महाराष्ट्राचे महागायक विजेते मोहंम्मद अयाज यांना महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री मा.सुधीर मुनगंटीवार यांच्या शुभहस्ते कलाश्री सन्मान देऊन गौरव करण्यात आले. यावेळी ओमानचे कॉनसल जनरल एक्सलंसी जमील अलबालुशी, इडोनेशियाचे कॉनसल जनरल एक्सलंसी अगस सापटोनो, पनामाचे कॉनसल जनरल एक्सलंसी जीझस कम्पोंज, फिल्म प्रोडयुसर, डांरेक्टर अएक्टर धिरज कुमार, मुंबई फिल्म फेडरेशन चे अध्यक्ष तिवारी, हास्य सम्राट सुनिल पाल, सुंदरी ठाकुर अध्यक्ष महीला सन्मान मुंबई, तसेच या कार्यक्रमाचे संयोजक श्री राजेश श्रीवास्तव सह निर निराळया क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम मुंबईतल्या जिमखाना येथे पार पडला. राज्याचे सांस्कृतिक मंत्री मा. सुधिर मुनगंटीवार यांनी मोहम्मद अयाज यांच्या संगीत प्रवासाची दखल घेतली.

## ॲट्रॉसिटी प्रकरणी महिलेस उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन

**सोलापूर** : मोहोळ येथे दत्त मंदिर जवळ पुर्व वैमनस्यावरून राजेश उर्फ राजाभाऊ जाधव यास व त्याच्या पत्नीस मारहाण करुन जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या आरोपावरून पुनम नानासाहेब रेवडकर रा. मोहोळ हिचे विरुद्ध दाखल झालेल्या गुन्ह्याच्या प्रकरणात तिने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती भारती डांगरे यांच्यासमोर होऊन न्यायमूर्तींनी पूनम रेवडकर हिचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला. आरोपी पूनम रेवडकर ही मोहोळ कोर्टाच्या समोर असलेल्या दत्त मंदिर जवळ गेली असताना आरोपी पूनम रेवडकर हिने फिर्यादीच्या पत्नीस व फिर्यादिस मारहाण केली व जातीवाचक शिवीगाळ केली. या आशयाच्या फिर्यादीवरून पूनम रेवडकर हिच्या विरोधात मोहोळ पोलीस ठाण्यात अट्रोसिटीचा गुन्हा दाखल झाला होता. याप्रकरणी तिचा अटकपूर्व जामीन अर्ज सोलापूर सत्र न्यायालयाने फेटाळला होता. सदर निर्णयाविरुद्ध आरोपीने ॲड. जयदीप माने यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. सदर प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान आरोपी पक्षातर्फे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, सदर प्रकरणातील फिर्यादीने घटने दिवशी आरोपी पूनम रेवडकर हिचा विनयभंग केलेला होता. याबाबत तिने मोहोळ पोलीस स्टेशनला फिर्याद देखील दिलेली होती. या घटनेस शह देण्यासाठी फिर्यादीने तिला या खटल्यात खोटेपणाने गुंतविले आहे व या घटनेबद्दल फिर्यादीच्या पत्नीने आरोपी पूनम रेवडकर हिच्या विरोधात पोलीस स्टेशन ला दिलेल्या फिर्यादीत जातीवाचक शिवीगाळ केल्याबाबत कोणताही उल्लेख नाही ही बाब आरोपी पक्षाच्यातर्फे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रानवरून सिद्ध होते. या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने, ॲड. विलासीनी बी यांनी तर सरकारतर्फे ॲड. एस. आर. आगरकर व मुळ फिर्यादीतर्फे ॲड. ठाकुर यांनी काम पाहिले.

## सांगोल्यात खासदार,आमदार आपल्या दारी

**सांगोला** : कृष्णा कोयना जलसिंचन प्रकल्प, म्हैसाळ योजना, टेंभू उपसा सिंचन योजना, निरा देवघर सिंचन योजना् या योजना पूर्णत्वास आणण्यासाठी शिंदे फडणवीस सरकारने कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. व अडीअडचणी जाणून घेण्याच्या अनुषंगाने खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार शहाजी बापू पाटील यांचा सांगोला तालुक्यात मंगळवार दिनांक ११ एप्रिल २०२३ रोजी गाव भेट दौरा आयोजित केला आहे. या दौऱ्यानिमित्त नागरिकांनी गावातील तक्रारी अडचणी व समस्या मांडाव्या जनतेच्या अडचणी समस्या सोडविण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खासदार रणजितसिंह निंबाळकर आमदार शहाजी बापू पाटील हे कटीबध्द रहाणार आहेत. असे भारतीय जनता पार्टीचे सांगोला तालुका अध्यक्ष चेतनसिंह केदार व शिवसेना सांगोला तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे यांनी सांगीतले.

## तायक्वांदो स्पर्धेत सरगरला कास्यपदक

**सांगोला** : केंद्र सरकार मान्यता प्राप्त महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद तायक्वांदो स्पर्धा नुकत्याच नांदेड येथे पार पडल्या या स्पर्धेमध्ये १४ वर्षे वयोगट सतरा वर्ष वयोगट व १९ वर्षा खाली वयोगट मुला मुलींच्या स्पर्धा दि. ८ व ९ एप्रिल २०२३ रोजी पार पडल्या. या स्पर्धेमध्ये विज्ञान महाविद्यालय सांगोल्याचां तायक्वांदो खेळाडू परमेश्वर दत्तात्रय सरगर याने कांस्य पदक प्राप्त केले व त्याची १४ ते १६ एप्रिल २०२३ रोजी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली त्याबद्दल त्याचा विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या खेळाडू महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विजय पवार व तालुका तायक्वांदो स्टार मार्गदर्शक . आबा वाघमोडे यांचे मार्गदर्शन लाभले

## कुशल बद्रिके साकारणार कुरबतखान

**सोलापूर** : विनोदाच्या अफलातून टायमिंगने प्रेक्षकांना पोट धरून हसायला लावणारा अभिनेता कुशल बद्रिके आता वेगळ्या रूपात प्रेक्षकांना दिसणार आहे. त्याचं हे रूप भल्याभल्यांना धडकी भरवणार आहे.रावरंभा' या ऐतिहासिक चित्रपटात तो क्रूरकर्मा कुरबतखान' या दमदार व्यक्तिरेखेत दिसणार आहे.विनोदी भूमिकांमधून प्रेक्षकांची मने जिंकल्यानंतर कुशल प्रथमच ऐतिहसिक आणि नकारात्मक भूमिकेत दिसणार आहे.येत्या १२ मे ला इतिहासातील हे मोरपंखी पान' पडद्यावर रसिकांसमोर उलगडणार आहे. निर्माते शशिकांत शीला भाऊसाहेब पवार आणि दिग्दर्शक अनुप जगदाळे रावरंभा' ही प्रेमकहाणी प्रेक्षकांसमोर आणणार आहेत.

## लताबाई ओव्हाळ यांचे निधन



**सोलापूर** : कुमठा नाका, मुक्ता बंगलोज, सोलापूर येथील रहिवासी श्रीमती लताबाई तुळशीराम ओव्हाळ यांचे दि. ९ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले मृत्यू समयी त्यांचे ६७ वर्षे वय होते. त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चाात दोन मुले, चार मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# महापालिकेतील १९ कर्मचाऱ्यांना आरोग्य निरीक्षकपदी पदोन्नती

## आयुक्त शितल तेली - उगले यांनी काढले आदेश

**सुराज्य/सोलापूर**

महापालिकेच्या आकृतीबंधातील आरोग्य निरीक्षकांच्या एकूण ७७ मंजूर पदांपैकी १९ पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत. महापालिकेतील मजूर, झाडूवाला, कनिष्ठ श्रेणी लिपिक व बिगारी यांना आरोग्य निरीक्षकपदी पदोन्नती देण्यात आली आहे. याबाबतचे आदेश सोमवारी महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी काढले आहेत.

महापालिकेच्या मंजूर आकृतीबंधात आरोग्य निरिक्षकांची एकूण ७७ पदे मंजूर आहेत. या मंजूर पदापैकी ५८ (७५ टक्के) पदे सरळसेवेने व १९ (२५ टक्के) पदे पदोन्नतीने भरणेबाबत नव्याने मंजूर केलेल्या सेवाप्रवेशामध्ये नमूद आहे. त्यानुसार वर्ग-३ व ४ संवर्गातील या पदासाठी सेवाप्रवेशमध्ये आरोग्य निरिक्षक पदासाठी विहित केलेली शैक्षणिक व अन्य अर्हता धारण करणारे कर्मचारी यांच्याकडून अर्ज मागविण्यात आलेले होते. विहित केलेल्या अर्हतानुसार कागदपत्राची तपासणी होऊन त्यानुसार खातेनिहाय समितीमध्ये ४३ अर्जदारापैकी ३२ अर्जदारांना पात्र व ११ कर्मचाऱ्यांना अपात्र करण्यात करण्याबाबत तसेच पात्र कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी, गोपनिय अहवाल व मक्ता व दायित्वे तपासणी करून त्यांचे आरोग्य निरिक्षक (पदोन्नती) या संवर्गातील रिक्त पदावर सेवा ज्येष्ठतेनुसार नियुक्ती करण्याबाबत निर्णय झालेला आहे. खातेनिहाय पदोन्नती समितीने पात्र ठरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची आरोग्य निरिक्षक या पदावर अटीस अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नतीने नियुक्ती देण्यात येत आहे. याबाबतचे कार्यालयीन आदेश महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी सोमवारी काढले आहेत.



**यांची झाली पदोन्नती –**

**कर्मचाऱ्यांचे नाव व कंसात पदनाम** : अंजली काकडे (मिडवाईफ), नितीन नराळे (मजूर), खाजप्पा कट्टीमनी (वाहनचालक), सोमनाथ ताकभाते (क.श्रे. लि.), रविंद्र सर्वगोड (क.श्रे. लि.), सोमनाथ सिध्दगणेश( क.श्रे. लि.), भैय्यासाहेब डोळसे (झाडूवाला), शिलरत्न दुडे ( बिगारी), दत्ता म्हस्के (मजूर), पद्मावती गळे (झाडूवाला), अ. वाहिद पेरमपल्ली (वरिष्ठ क्षेत्रकार्यकर्ता), अतुल मस्के (झाडूवाला), शिवप्रसाद कुलकर्णी (बिगारी), विश्वास क्षिरसागर (क.श्रे. लि.), श्रीदेवी गायकवाड (बिगारी), गोरीशंकर बनसोडे (बिगारी), शुभम रणखांबे (बिगारी), सुप्रिया कांबळे (बिगारी), अशोक इंगळे (झाडूवाला).

## मोहोळ शहराच्या पाईप लाईनला गळती, नगरपरिषदेचे दुर्लक्ष

**मोहोळ** : मोहोळ शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनला मोठ्या प्रमाणात गळती सुरू झाली असून मागील आठ ते दहा दिवसापासून नगर परिषदेच्या कर्म चाऱ्याचे याकडे डोळेझाक होत असल्याने नगरपालिकेच्या कारभारावर नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. मोहोळ शहराला सीना नदी पात्रातून पाणीपुरवठा केला जातो या पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन खूप जुन्या असून ती वारंवार सातत्याने अधून मधून लिकेज होते असतात स्टेशन रोडवरून मोहोळ शहराकडे येणाऱ्या जुन्या चुना फॅक्टरी मोठी गळती सुरु झाली आहे. याबाबत संबंधित नागरिकांनी तेथील रहिवाशांनी नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यास अधिकाऱ्यास वारंवार याबाबत सांगून ही याकडे नगर परिषदेचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे नेमके काय? या नगरपालिकेची भूमिका अशी का याबाबत संशय व्यक्त केला जात आहे व अशा या अडमुठे पणाच्या नगरपरिषदेच्या भूमिकेमुळे नागरिकातून संताप व्यक्त होत मोहोळ शहरालाआठ ते दहा दिवसातून पाणीपुरवठा होत असतो संपूर्ण मोहोळ शहराला पाणीपुरवठा एका वेळेस करणे अवघड आहे तेवढा पाणीसाठा उपलब्ध असल्याने आठ ते दहा दिवसातून एका गल्लीला पाणी मिळते अशी परिस्थिती असतानाही व एवढे मोठे प्रमाण पाणी वाया जात असतानाही नगरपरिषद व नगरपरिषदेचे कर्मचारी याकडे का दुर्लक्ष करतात यामुळे नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे.

## महा एनजीओ फेडरेशनची आढावा बैठक

**सुराज्य/सोलापूर**



महा एनजीओ फेडरेशनच्या सोलापुरातील बैठकीत विविध सामाजिक प्रश्न व समस्या तसेच सामाजिक संस्थांच्या अडीअडचणींवर विचार मंथन झाले. पुढील काळात सामाजिक संस्थांसाठी विशेष कार्यशाळा आयोजनाचा निर्णय घेण्यात आला.

यावेळी ९० हून अधिक सामाजिक संस्थांचे प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग नोंदविला.

महा एनजीओ फेडरेशनच्या वतीने सोलापूर मधील सामाजिक संस्थाची आढावा बैठक सोनी महाविद्यालय सैफुल येथे पार पडली. या बैठकीला ९० पेक्षा जास्त सामाजिक संस्थाचे प्रतिनिधी उपस्थित होते.महा एनजीओ फेडरेशनचे संस्थापक शेखर मुंदडा यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये सामाजिक संस्थांची आढावा बैठक घेण्यात येत आहे. त्याची सुरुवात सोलापूर शहर व जिल्ह्यातील सामाजिक संस्थांच्या या बैठकीने शनिवारी झाली.

या बैठकीमध्ये दक्षिण सोलापूरचे आ. सुभाष देशमुख, महा एनजीओ फेडरेशनचे संचालक मुकुंद शिंदे, संचालक अमोल उंबरजे , गणेश बाकले, समन्वयक महेश कासट आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. आमदार सुभाष देशमुख यांनी सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधी सोबत संवाद साधला. महा एनजीओ फेडरेशन द्वारे सोलापुरात शेखर मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली एक कार्यालय स्थापन करून सोलापूर शहर व जिल्ह्यातील संस्थांना कशी मदत करता येईल याबाबत मार्गदर्शन केले.

सामाजिक संस्थांना येणाऱ्या अडचणी महा एनजीओ फेडरेशनद्वारे कश्या सोडवता येईल याबाबत चर्चा केली. समन्वयक महेश कासट व विजय जाधव यांनी सामाजिक संस्थेच्या वतीने आपले मत मांडले.

या आढावा बैठकीचे सूत्रसंचालन मनोज देवकर यांनी केले. तर आभार विजय जाधव यांनी मानले. सोनी महाविद्यालयाच्या संचालिका वासंती अय्यर यांच्यासह विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त सहा संस्था एकत्रित करणार अभिवादन

**सुराज्य/सोलापूर**



देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था,सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंच, एल. जी. काकडे एज्युकेशनल फाउंडेशन, देशभक्त डॉ. कृ. भी.अंत्रोळीकर प्रतिष्ठान, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविधांगी कार्यावर डॉ. श्रीकांत येळेगावकर व डॉ. नभा काकडे हे प्रकाश टाकणार आहेत. हा कार्यक्रम शुक्रवार दि. १४ एप्रिल २०२३, रोजी सकाळी १०.०० वाजता दत्त चौक येथील श्री. समर्थ रामदास सभागृहात आयोजीत करण्यात आले आहे.

तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्याम जोशी, सुनील पुजारी, ॲड. अनिल काकडे, मोहन अंत्रोळीकर, प्राचार्य के.एम. जमादार, उल्हास पाटील यांच्यावतीने करण्यात येत आहे.

## भूमापन दिनानिमित्त उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा सत्कार

**सुराज्य/सोलापूर**

भूमापन दिनानिमित्त जिल्हा भूमी अभिलेख कार्यालय या ठिकाणी उत्कृष्ट काम केलेल्या कर्मचाऱ्यांच्या गौरव कार्यक्रमाचे आयोजन सोमवारी करण्यात आले. जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, मुद्रांक जिल्हाधिकारी गोविंद गीते, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख हेमंत सानप यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती. यावेळी भूमापन करणाऱ्या आधुनिक यंत्रांचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वर्षभरात उत्कृष्ट काम केलेल्या गुणवंत कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

जिल्ह्याच्या विकासात भूमी अभिलेख कार्यालयाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. जेव्हा आवाज दिला तेव्हा सर्व कर्मचारी हजर राहिले, सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाचे रस्ते, सुरत चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग तसेच रेल्वे मार्गाला लागणारी जमीन याची मोजणी चांगल्या पद्धतीने झाली आहे. त्याचे निश्चितच कौतुक करावे लागेल मात्र आपल्या विभागाला गालबोट लागेल किंवा प्रतिमा मलिन होईल असे कोणतेही काम करू नका अशा सूचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी यावेळी दिल्या प्रारंभी प्रास्ताविकात हेमंत सानप यांनी १० एप्रिल भूमापन दिन साजरा करण्यामागील इतिहास सांगितला.

## घरगुती गॅस सिलेंडरचा काळाबाजार; चौघांवर गुन्हा

**सुराज्य/सोलापूर**



स्वयंपाक करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गॅस टाकीमधील गॅस अवैधपणे रिक्षात भरताना सिलिंडर व अन्य साहित्य पोलिसांनी जप्त केले आहे. याप्रकरणी चौघांविरोधात वळसंग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्षय आनंद डोंगरे (वय-२४, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नितीन अंबादास यादगिरी (वय-३५),जाफर ईरमाईल कारगिर (वय-३५), आदिल रफिक शेख (वय-३५), विजय गणपा (वय-३४) या चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी सांगितलेली माहिती अशी की,स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कुंभारी येथे अवैध गॅस रिक्षात भरत असताना धाड टाकली.या धाडीत रिक्षा, इलेक्ट्रिक मोटार, पाइप, नोझल, वजनकाटा, ७ घरगुती वापरणाऱ्या सिलिंडरच्या टाक्या, १ रिकामी टाकी, असा एकूण १ लाख ७६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणाची नोंद वळसंग पोलिस ठाण्यात झाली असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक शेख करीत आहेत.



## चंदेले महाविद्यालयात पत्रकारितेवर मार्गदर्शन

**सुराज्य/सोलापूर**

भाई छन्नुसिंह चंदेले समाजकार्य महाविद्यालयात वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम अंतर्गत 'संपादक: कार्य आणि जबाबदारी' विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक मान्यताप्राप्त विशाखा महिला लोकसंचालित साधन केंद्र सोलापूर द्वारा अभ्यास केंद्र क्रमांक- ६५१५३ आणि भाई छन्नुसिंह चंदेले समाजकार्य महाविद्यालय तसेच कै.महादेव विठ्ठल होनमुर्गीकर गुरुजी यांच्या स्मरणार्थ हा कार्यक्रम पार पडला.

अध्यक्षस्थानी विशाखा महिला लोकसंचालित साधन केंद्र अभ्यासकेंद्राचे अध्यक्षा आणि सोलापूरच्या माजी महापौर नलिनी चंदेले या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून सुराज्यचे वरिष्ठ उपसंपादक विजय गायकवाड, बहुजन आवाज न्यूज चॅनल सोलापूरचे शहर प्रतिनिधी रवी देवकर, विशाखा महिला अभ्यासकेंद्राच्या संचालिका सविता चंदेले, सचिवा मनीषा पाटील, प्राचार्य सिद्धार्थ गायकवाड, केंद्र सहाय्यक विशाल पाटील, प्रा. संग्राम कांबळे, अरुण धोत्रे, विश्वराध्य होनमुर्गीकर उपस्थित होते. प्रारंभी आद्य संपादक 'दर्पणकार' बाळशास्त्री जांभेकर आणि देशभक्त भाई छन्नुसिंह चंदेले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

नूतन पत्रकारांच्या वतीने संगीता मेंथे, नागनाथ गायकवाड, विश्वराध्य होनमुर्गीकर यांनी आपले अनुभव कथन करीत शिक्षकांचे ऋण मानले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते या कार्यशाळेत सहभागी झालेल्या उपस्थित सर्व नूतन पत्रकारांचा प्रमाणपत्र व लेखणी देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्राचार्य सिद्धार्थ गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन विजयकुमार लोंढे यांनी केले तर सूरज आरकराव यांनी आभार मानले. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महेश कोरे, गजानन लोणार, कल्लाप्पा फुलारी, अभिजीत भंडारे, सुनील पेंटर, समीर शेख, केशव कोळी आदींनी परिश्रम घेतले.

# इंजिनिअरिंग युथ फेस्टिवल उत्साहात

### डिग्रीमध्ये स्वेरी व पॉलिटेक्निकमध्ये सिद्धेश्वर वुमन्स अव्वल

**सुराज्य/सोलापूर**



आयएसटीई, आयईआय व टेक्नोक्रेट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित इंजिनिअरिंग व डिप्लोमा या महाविद्यालयासाठी ३० मार्च ते ४ एप्रिल दरम्यान संपन्न झाला. ज्यामध्ये विविध विभागांमध्ये क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, टेक्निकल स्पर्धा व सामाजिक संदर्भातील स्पर्धा या संपन्न झाल्या. याचा बक्षीस समारंभ दि.९ एप्रिल रोजी बिल्डर असोसिएशनचे अध्यक्ष दत्तात्रय मुळे, आयईआयचे सेक्रेटरी प्रा. एम. एस. देशपांडे, रविंद्र नाशिककर, संयोजक डॉ. नरेंद्र काटीकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी प्रास्ताविक करताना डॉ. काटीकर युथ फेस्टिवल ची संकल्पना विशद करताना म्हणाले की गेले आठवड्यावर चालू असलेल्या स्पर्धांमधून सुमारे ३५ व्यावसायिक महाविद्यालयांनी सुमारे साडेतीन हजार अधिक विद्यार्थ्यांनी ७५ विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. ज्यामध्ये ज्यामध्ये क्रीडा विभागात क्रिकेट, कबड्डी, खो खो, फुटबॉल, रनिंग स्पर्धा तर सांस्कृतिक विभागांमध्ये ग्रुप डान्स, मेहंदी, रांगोळी, पोस्टर, एकपात्री, सिंगिंग अशा विविध स्पर्धांसह टेक्निकल विभागातीलही स्पर्धा संपन्न झाल्या. विशेष करून विद्यार्थ्यांच्या अभियांत्रिकी ज्ञानावर आधारित परंतु व्यवहारात उपयोगीअशा विषयांना अनुसरून १० टेक्निकल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर सामाजिक विभागामध्ये पथनाट्य स्पर्धा ही आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी भारत मातेचे पूजन करून समारंभाची सुरुवात करून प्रमुख पाहुणे प्राध्यापक मोहन देशपांडे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांग सुंदर अशा व्यक्तिमत्व विकासासाठी अशा युवा महोत्सवाचे आयोजन या संस्था करीत आहेत. त्याचबरोबर या माध्यमातुन त्यांना मिळणारे व्यासपीठ हे त्यांच्या कलागुणांना वाव देऊन, त्यांना ते स्वतः कुठे आहेत हे पाहण्याचे संधी निर्माण करतात. दत्ता मुळे बोलताना म्हणाले की, 'हे अनुभव तुम्हाला दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरणार आहेत. त्याचबरोबर त्यांनी भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देताना, ज्ञान तंत्रज्ञानाच्या व्यवहारात उपयोगाची माहिती दिली.'

या बक्षीस वितरण कार्यक्रमामध्ये ७५ स्पर्धा साठी, सातशे विद्यार्थ्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्व. जगदीश जाजू अभियांत्रिकी चषक हा जिल्ह्यातील डिग्री कॉलेजेस मधून स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालय पंढरपूर यांनी पटकावला तर जिल्ह्याचे सर्व पॉलिटेक्निक महाविद्यालय मधून सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक यांनी जनरल चॅम्पियन पटकावली.

या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी राहुल उलागड्डे, प्रवीण तळे, डॉ. प्रशांत चाबुकस्वार, अनिल यरगल, डॉ.विजय वडेर, प्रा.कृष्णा कोळी, विकास कुलकर्णी तुषार गुणके, तेजस केलुरकर, कुणाल कुंटे, विनोद ईराबत्ती, धनू गड्डम, जय गंधमल, जिनेश पाटील, सिद्धांत जेउरे, यश शिरसागर, आदिती नेलुरे, वैष्णवी निळ, श्रद्धा कविटगी, आदींनी परिश्रम घेतले.



## गुरव समाज पतसंस्थेच्या चेअरमनपदी मोकाशी यांची निवड

**उत्तर सोलापूर :** गुरव समाज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सोलापूरच्या चेअरमनपदी प्रकाश मोकाशी यांची,व्हाईस चेअरमनपदी मल्लिकार्जुन गुरव यांची अविरोध निवड निवडणूक निर्णय अधिकारी एस डी वटटे ह्यांनी २०२३ ते २०२८ पंचवार्षिक कालावधी साठी निवड केली. .यावेळी संचालक रंगनाथ गुरव, चंद्रकांत गुरव,सागर पाटील,किरण डांगे, काशिनाथ मेलगीरी, शितल पाथरकर, महादेवी फुलारी, श्रीमंत व्हनकडे, महादेव बिराजदार यांचा माजी चेअरमन, विद्यमान संचालक तथा सोलापूर जिल्हा पतसंस्था संचालक रंगनाथ एकनाथ गुरव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक सुभाष डांगे, किशोर पाटील, व्यवस्थापक अनिल मोने यांच्यासह पतसंस्थेचे सभासद, कर्मचारी उपस्थित होते.

## पंचशील युवा मंडळ अध्यक्षपदी तुरबे, कदम उपाध्यक्षपदी

**दक्षिण सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त भंडारकवठे पंचशील युवा मंडळाच्या अध्यक्षस्थानी राजरत्न तुरबे तर उपाध्यक्षपदी प्रकाश कदम यांची एकमताने निवड करण्यात आली. पंचशील युवा मंडळाचे पदाधिकारी पुढील प्रमाणे कार्यअध्यक्ष -रोहित कदम, खजिनदार- सुहास तुरबे सहखजिनदार- सुनील घाडगे, सचिव -पीरसाहेब तुरबे सहसचिव विनोद काटे,आकाश कांबळे इ.यावेळी पंचशील युवा मंडळ अध्यक्ष राजरत्न तुरबे यांनी दैनिक प्रतिनिधी बोलताना सांगितले की दिनांक १४ एप्रिल ते २७ एप्रिल पर्यंत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. या जयंतीच्या काळात भंडारकवठे गावातील परिसरातील सर्व नेतेमंडळी सामाजिक कार्यकर्ते यांच्या उपस्थितीमध्ये मान्यवरांच्या हस्ते विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये रांगोळी स्पर्धा, संगीत खुर्ची, लिंबू चमचा, रनिंग, निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा इत्यादी स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.यावेळी पंचशील युवा मंडळाचे मार्गदर्शक म्हणून सुरेश तुरबे,अशोक कदम, रवींद्र तुरबे, रवींद्र कदम, रायप्पा कदम, शशिकांत तुरबे, संभाजी तुरबे, दत्तात्रय कदम, नेहरू तुरबे, यल्लाप्पा तुरबे, प्रवीण तुरबे, वसंत कदम, ज्ञानेश्वर कदम, बाबासाहेब कदम, तीप्पणा तुरबे, प्रशांत कदम, प्रवीण तुरबे, शिवानंद गायकवाड, हनुमान गायकवाड, विकास कांबळे, रमेश कदम, राहुल सोगळ, आमसिध्द कदम, महावीर घा, अमोल कांबळे, बबलू कदम, जय बनसोडे, चंदू कदम, रामजी कदम, पंडित कदम, राजू कदम, मधुकर कदम आदी पंचशील युवा मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सांगोला तालुक्यामध्ये काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस

**सांगोला :** सांगोला तालुक्यामध्ये काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला असून उष्णतेपासून हैराण झालेल्या नागरिकांना या पावसापासून काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे तर दुसरीकडे वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने बळीराजाला मात्र फटका बसला आहे शेतकऱ्यांच्या द्राक्ष आंबा पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे तसेच काही ठिकाणी कडब्याच्या ढेप ही उडून गेले आहेत सोसाट्याच्या वाऱ्यासह आणि मेघगर्जनेसह अवकाळी पावसाने हजेरी लावली पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला बुधवारी वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली तालुक्यातील काही भागांमध्ये शेती पिकांचे तसेच आंबा द्राक्षे चिक्कू फळ पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे सांगोला तालुक्यात यापूर्वी झालेल्या अतिवृष्टी मधील नुकसानीचे पंचनामे झाले अद्याप अनेक शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत तोपर्यंतच अवकाळी पावसाचा फटका बसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

## महात्मा फुले जयंती निमित्त आज सांगोला शहरामध्ये मिरवणूक

**सांगोला :** क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १९६ व्या जयंती निमित्त उद्या सकाळी ठीक ९.३० वाजता सांगोला शहरामध्ये भव्य मिरवणूक व शोभायात्रा निघणार आहे तसेच शहरातील राष्ट्रीय महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यासाठी पदयात्रा काढण्यात येणार आहे मंगळवार दिनांक ११ एप्रिल रोजी सकाळी ठीक ८.३० वाजता सामुदायिक पुष्पहार अर्पण व विविध क्षेत्रात नाव लौकिक केलेल्या मान्यवरांचा जयंती मंडळाच्या वतीने सन्मान चिन्ह देवून गुणगौरव करण्यात येणार आहे तसेच ठीक ९.३० वाजता महात्मा फुले यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक व शोभायात्रा काढण्यात येणार आहे तरी तमाम महात्मा फुले प्रेमींनी महामानव क्रांतीसुर्य महात्मा फुले यांना अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ही नम्र विनंती असे आवाहन महात्मा फुले जयंती उत्सव मंडळ सांगोला यांच्या वतीने करण्यात आले आहे

## पिलीव येथे शेळ्या चोरीचे सत्र सुरुच; ९ शेळयांची चोरी

**पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरात गेल्या अनेक दिवसांपासून शेळया चोरींचे सत्र सुरूच आहे, अनेक शेळया चोरीला गेल्या पण पोलीसांना अदयापही शेळया चोरांचा शोध लावणे शक्य झाले नाही. रविवारी रात्री पिलीव येथील सागर स्वामी ४ शेळया,संजय रामचंद्र सुळे २ शेळया तर समीर काझी यांच्या ३ शेळया एकाच रात्रीत चोरीला गेल्या आहेत. गेल्या दहा दिवसापुर्वी याच भागातील शेळया चोरीला गेलया होत्या. दहा दिवसाच्या विश्रांती नंतर पुन्हा एकाच रात्रीत तब्बल ९ शेळया चोरीला गेल्यामुळे शेतकऱ्यांनमध्ये भितीचे वातावरण आहे. यामुळे शेतकऱ्यांनचे प्रचंड मोठे आर्थिक नुकसान होत आहे. तर सदर शेतकऱ्यांनी शेळया चोरींच्या अनेक तक्रारी पिलीव पोलीस ठाण्यात दाखल केल्या आहेत पण अदयापही शेळया चोरीचा छडा लागला नाही.

# कुर्डूवाडीत जैन मंदिरावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी

### जैन एकता महोत्सव उत्साहात साजरा

**सुराज्य/कुर्डूवाडी**

कुर्डूवाडी येथील श्री सन्मती सेवा दल बहुउद्देशीय अल्पसंख्याक संस्था आणि सकल जैन समाज यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वो द्वय विश्वधर्मा जन्मकल्याण जैन ऐकता महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. कुर्डूवाडी येथील जैन मंदिरावर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी शोभयात्र मोठ्या उत्साहात काढण्यात आली. या कार्यक्रमांसाठी राज्यातील सात जिल्ह्यातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

रविवारी सकाळी ७ वाजता मंदीरावरील ध्वजारोहण राजेश गांधी, शोभायात्रा उद्घाटन महेश गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. या मिरवणूक रथ बगी, अश्व, हत्ती व विविध सामाजिक संदेश देणारे फलक, बँड पथक, महिला, पुरुष, मुले, मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भगवान महावीराची प्रतिमा हत्तींवर ठेवण्यासाठी विलास जयकुमार दोशी व मंडपाचे ध्वजारोहण डॉ. विलास मेहता यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागत व्दार विशाल भारत पुर्वत तर जैन सन्मानचिन्ह संतोष हिरालाल जोशी यांच्या वतीने देण्यात आले होते.

यावेळी मुनीश्री १०८सागर महाराज व मुनीश्री १०८ पुराण सागरजी महाराज यांनी प्रवचनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन संदेश दिला. यावेळी स्वागत स्वागत अध्यक्ष सुहास शहा, गौरव अध्यक्ष डॉ. प्रवीण तांबोळी, डॉ. लकी दोशी, डॉ.संतोष दोशी, डॉ. निशांत शहा, प्रा.प्रमोद शहा, महेंद्र मेहता, संकेत दोशी, शितल तांबोळी, ॲड. प्रमोद पलसे,केतन संचेती, प्रकाश शहा, अनुप दोशी, प्रशांत धोका, अक्षय शेटे, रोहित पुरवत, जिर्तेंद्र दोशी, विजयकुमार मेहता, अमोल दोशी, स्वप्निल फडे, महावीर दोशी, निखिल शहा, महावीर देशमाने, सोहम शहा, सौरभ दोशी, शुभम बुबणे, संदेश पालिया, बंडू भाळवणकर, सागरिका शहा, सायली शहा, वैशाली शहा, स्नेहा फडे, सारिका दोशी, प्रिया मेहता, मंगल संचेती किरण सुराणा,संगीता व्होरा, शैला बहिरशेठ, पुनम फडे, प्रणिता दोशी आदींनी परिश्रम घेतले.




### हेलिकॉप्टरमधून पुष्वृष्टी

कुर्डूवाडी येथील जैन मंदिरावर व मिरवणुकीवर हेलिकॉप्टरमधुन सराफ व्यापारी चेतन शहा पत्नी वैशाली शहा, नम्रता शहा, प्रशांत शहा, ऋतुराज शहा, डॉ. समृद्धी शहा, यशराज शहा यांनी हेलिकॉप्टर मधून अनंतनाथ दिगंबर जैन मंदिरावर परिक्रमा करत जैन मंदिर व एकता रॅलीतील हत्तीवरती असलेल्या महावीरांच्या प्रतिमेवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी केली.

## सांगोला रेल्वे थांब्यासाठी १० हजार पोस्ट कार्ड पाठवण्याचे अभियान

### कलबुर्गी-कोल्हापूर रेल्वे थांब्यासाठी कामटे संघटनेचे अभियान

**सांगोला :** कलबुर्गी-कोल्हापूर -कलबुर्गी या रेल्वेस सांगोला येथे रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा या मागणीसाठी दहा हजार पोस्ट कार्ड पाठवण्याचा अभियान शुभारंभ स्टेशन रोड येथील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्या कार्यालयात करण्यात आला. ही पत्रे रेल्वेमंत्री भारत सरकार, रेल्वे राज्यमंत्री, खासदार नाईक-निंबाळकर, महाव्यवस्थापक मुंबई यांना पाठवण्यात येणार आहे.



अभियानाच्या पहिल्या टप्प्यात सोमवारी सुमारे ५००० पोस्ट कार्डे पाठविण्याचा शुभारंभ करण्यात आला. सांगोला रेल्वे स्टेशन हे महत्त्वाचे रेल्वे स्टेशन हे शहर मिरज-कुर्डूवाडी लोहमार्गावरील महत्वाचे शहर आहे. शहरातून अनेक मोठे राष्ट्रीय राज्य महामार्गावरील महत्त्वाचे शहर आहे. या शहरात मोठी बाजारपेठ असल्याने तालुक्यातील व इतर जिल्ह्यातून परिसरातील नागरिक शहरात सतत येजा करीत असतात त्यांच्या सोयीसाठी २२१५५ २२१५६ कलबुर्गी- कोल्हापूर- कलबुर्गी येथे रेल्वे थांबा असणे आवश्यक आहे. याकरिता शहीद अशोक कामटे संघटनेने सहा महिन्यांपासून अनेक वेळा निवेदने, स्मरणपत्रे, मोर्चा आंदोलन केलेले आहे तरीही रेल्वे प्रशासनाने रेल्वेने अधिकृत थांबा मंजूर केलेला नाही. यावेळी या अभियानास शहरातील अनेक नागरिक यावेळी उपस्थित होते. अभियान यशस्वी करणेसाठी अशोक कामटे सामाजिक संघटनेचे सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत.

## कृषी विकास अधिकारी कुंभार यांना बढती

**सोलापूर :** जिल्हा परिषद कृषी विभागाचे कृषी विकास अधिकारी विवेक कुंभार यांची प्रमोशन बदली झाली असून सांगली जिल्ह्याच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुंभार हे जिल्हा परिषदेमध्ये दोन वर्षाहून अधिक काळ कार्यरत होते.

या कार्यकाळात जिल्हा परिषद कृषी विभागाकडे असलेले महत्त्वपूर्ण अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेमध्ये चांगल्या पद्धतीने कामकाज केले होते. याचबरोबर सेस फंडातील, डीबीटी योजनेत, शंभर टक्के निधी खर्च होण्याबाबत त्यांनी प्रयत्न केले होते. बुधवार ५ एप्रिल रोजी राज्याच्या कृषी विभागाने गट अ कृषी उपसंचालक संवर्गातून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी या संवर्गात पदोन्नती दिल्या आहेत. त्यात कुंभार यांना सांगली जिल्ह्यात नियुक्ती देण्यात आली.

## उत्तरच्या आमसभेचे अध्यक्षपद कोण भूषविणार, की रखडणार?

### तीन आमदार, त्रिकूट एकत्र येणार कधी

**उत्तर सोलापूर :** माजी आमदार रमेश कदम यांच्या अध्यक्षतेखाली,बळीराम साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत,निवृत्त प्रभारी गट विकास अधिकारी महादेव बेळळे यांच्या उपस्थित उत्तरची आमसभा २०१५ ला झाली.या सभेत महत्त्वाच्या विषय मार्गी लावण्यात आले होतें.

सीना नदीच्या पात्रातील पाणी आणि वाळू हा विषय घुमला होता. अनेक आजी माजी कार्यकर्त्यांनी आवाज उठविल्याने उत्तर ची आमसभा चांगलीच गाजली. तत्कालीन अध्यक्ष त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव अध्यक्ष पद त्यांना मिळाले नाही.त्यानंतर आमसभा घेतली गेली नाही, दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख यांनी अध्यक्ष पदासाठी इच्छुक असून आमसभेला परवानगी मिळावी असी मागणी जिल्हा प्रशासनाला केली होती.पण परवानगी दिली नाही.आठ वर्षे होत आले उत्तरची आमसभा झाली नाही.२३ -२४ आमसभा आयोजित केल्यास आमदार यशवंत माने हे अध्यक्ष पदाचे मानकरी असताना ते काही कारणास्तव चाल ढकल करत असल्याचे दिसून येत आहे.चौकशी केली असता आम्ही तिन्ही आमदार एकत्र आलो नाही,अजून आम्ही चर्चा केली नाही. असे आमदार माने यांनी सांगितले आहे. शासनाचा कारभार चालू असून त्यावर नियंत्रण,रखडलेल्या विविध समस्या, प्रस्ताव ह्यांना मंजुरी मिळावी म्हणून आमसभा घेण्यात यावी अशी मागणी उत्तर तालुका वासियातून केली जात आहे.



## महापुरुषांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे महात्मा ज्योतिबा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सकाळी ९ वाजता पिलीव बसस्थानकावर महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन, त्यानंतर पिलीव बाजारपेठेतुन रॅलीचे आयोजन, त्यानंतर पिलीव ग्रामपंचायत सभागृहात भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन तर सायंकाळी ६ वाजता महात्मा जोतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेची बसस्थानकावरुन मिरवणूक काढण्यात येणार आहे. तरी समाजबांधवांनी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## भाजपाच्या पंचायतराज विभागाच्या जिल्हा संयोजकपदी दशरथ काळे यांची निवड

**मोहोळ :** मोहोळ येथील सामाजिक कार्यकर्ते दशरथ काळे यांची भाजपाच्या पंचायत राज व ग्रामविकास विभागाच्या सोलापूर जिल्हा संयोजक पदी निवड करण्यात आली. या निवडीमुळे त्यांचे स्वागत होत आहे.



दशरथ काळे यांनी भारतीय जनता पार्टीच्या ग्रामीण शाखेपासून बूथ यंत्रणेपर्यंत काम केले आहे तसेच भाजपा युवा मोर्चाचे मोहोळ तालुका उपाध्यक्ष त्याचबरोबर भारतीय जनता पार्टीचे मोहोळ तालुका अध्यक्ष पदावर त्यांनी काम केले आहे तसेच पंढरपूर मंगळवेढा विधानसभेच्या प्रचारक पदावर ही त्यांनी काम केले आहे या सर्व कार्याची दखल घेऊन पक्षाने त्यांना पुणे येथे झालेल्या खास बैठकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या पंचायत राज व ग्रामीण विकास विभागाच्या जिल्हासंयोजक पदी निवड केली आहे ही निवड पंचायत राज व ग्रामविकास विभागाचे प्रदेश अध्यक्ष गणेश जगताप प्रदेश सहसंयोजक राजीव शर्मा प्रसाद कुलकर्णी पश्चिम महाराष्ट्र विभाग संयोजक समाधान गायकवाड यांच्या हस्ते काळे यांना निवडीचे पत्र देण्यात आले. या निवडी बददल दशरथ काळे यांचे अभिनंदन होत आहे.




## विविध कंपन्यांच्या मान्यवरांनी दिली स्वेरीला सदिच्छा भेट

**पंढरपूर :** गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटचे संस्थापक विश्वस्त हणमंत बागल यांचे १९८५ चे सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अंधेरी (वेस्ट) मुंबईचे वर्गमित्र असलेले सेवानिवृत्त कर्नल मनोज मुजुमदार, अशोका बिल्डकॉनचे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रकल्प) संजय लोंढे, कंटूर्स इंटीरिओ प्रायव्हेट लिमिटेड'चे व्यवस्थापकीय संचालक पराग एडवणकर, मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या कुसरो वाडीया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीचे सेवानिवृत्त प्राचार्य विनायक राव, चंद्रकांत गवळी, उद्योगपती शिशिर सदावर्ते, निलेश भावे, संजय तांबोळी यांनी स्वेरीला सपत्नीक सदिच्छा भेट दिली.

यावेळी या सर्व अधिकाऱ्यांनी डिप्लोमा इंजिनिअरिंग व डिग्री इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टीने बहुमोल मार्गदर्शन केले. यावेळी भावी अभियंत्यांना कर्नल मुजुमदार व इतर पदाधिकारी यांनी विशेष मार्गदर्शन केले. स्वेरीचे संस्थापक विश्वस्त एच.एम.बागल यांनी सर्व मित्र व अधिकाऱ्यांचे स्वेरीच्या वतीने स्वागत केले. प्रास्ताविकात एच.एम.बागल यांनी केले. नाशिक मधील अशोका बिल्डकॉनचे संचालक व प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय लोंढे यांनी मॉडर्न टेक्नॉलॉजी अँड इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स' यावर विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. यावेळी या अधिकाऱ्यांच्या सुविद्य पत्नीस्नेहा भावे, अंजली लोंढे, माधवी मुजुमदार, सौ. विजया गवळी, अपर्णा सदावर्ते, सपना राव, मंजुषा तांबोळी, वैशाली एडवणकर आदी उपस्थित होत्या. यावेळी संस्थेचे माजी अध्यक्ष व संस्थापक विश्वस्त नामदेव कागदे, अलका बागल व डॉ.व्ही.एस.क्षीरसागर यांनी सर्वांचे स्वागत केले तर संशोधन अधिष्ठाता डॉ.आर.आर.गिड्डे यांनी सर्वांचे आभार मानले.

## महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

**वेळापूर :** महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त व धैर्यशील मोहिते पाटलांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पिसेवाडी (ता.माळशिरस) येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी महात्मा जोतीराव फुले, शिवाजी महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर रक्तदान शिबिराचे उद्घाटन कारखान्याचे माजी संचालक महादेव चव्हाण, शिवांमृतचे नूतन संचालक व पिसेवाडी ग्रामपंचायतचे माजी



सरपंच सुरेश पिसे, पिसेवाडी सरपंच मोहन भाकरे, क्रांतीसुर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष आण्णासाहेब शेंडे यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक माजी सरपंच अण्णासाहेब शेंडे यांनी केले. यानंतर झालेल्या रक्तदान शिबिरात ११७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाला उपसरपंच भाऊसाहेब पिसे, माजी सरपंच मोनिका शेंडे, पांडुरंग पिसे, माजी उपसरपंच अशोक भाकरे, माजी उपसरपंच वेळापूर मल्हारी बनकर, बीज उत्पादन सहकरी संघ चेअरमन श्रीकांत देशमुख, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष दादा पिसे, ग्रामपंचायत सदस्य पुष्प पिसे, तंटामुक्त समिती अध्यक्ष वेळापूर युवराज मंडले, ज्ञानेश्वर पिसे, मल्हारी म्हेत्रे, खंडू म्हेत्रे, वसंत पिसे, ज्ञानेश्वर बोराटे, दीपक पिसे, अमोल राऊत, दादा शिंदे, सीताराम पवार, आशोक शेंडे, रुकमनंद बनकर,उत्तम पिसे, नागनाथ वाघमोडे, हरिदास वाघ, संतोष पिसे, सुभाष शिंदे तसेच क्रांतीसुर्य प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, तरुण वर्ग व ज्येष्ठ मंडळी उपस्थित होते.

## रसिका-सानिकाच्या भक्ती संगीताने गुंफले धर्मसंकीर्तनाचे तिसरे पुष्प

### संगीतमय भक्तीने वटवृक्ष मंदिरातील उपस्थित भाविकही गहिवरले

**सुराज्य/अक्कलकोट**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील स्वामी समर्थ महाराजांच्या १४५ व्या पुण्यतिथी महोत्सवातील धर्मसंकीर्तन महोत्सवात आज सोलापूरातील सुप्रसिध्द गायिका कु.रसिका व कु.सानिका कुलकर्णी यांच्या भक्ती व सुगम संगीताने धर्मसंकीर्तन महोत्सवाचे तिसरे पुष्प गुंफले. या धर्मसंकीर्तन महोत्सवातील रसिका व सानिकाच्या या भक्ती व सुगम संगीत गायन सेवेने भाविकांच्या मनाचा ठाव घेत संगीतमय भक्तीने वटवृक्ष मंदिरातील उपस्थित भाविकही गहिवरले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी केले.

रसिका व सानिका कुलकर्णी यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यानंतर रसिका व सानिका या गायिकांनी या भक्ती सुगम संगीत गायन सेवेत प्रथम तुला वंदितो, जय जय जग जननी देवी, देव देव्हाऱ्यात नाही, पराधीन आहे जगती, भिऊ नको मी तुझ्या पाठीशी आहे, अशा प्रकारची सुंदर गाणी उपस्थित स्वामी भक्तांसमोर स्वामींच्या चरणी अर्पण केली. या गायन सेवेतून त्यांनी भक्तीयुक्त गीत गायन करून अवीट गोडीने भक्तिरसात भाविकांना वत्सलतेच्या भावभक्तींची अनुभूती प्राप्त करून दिली. या कार्यक्रमात त्यांना तबल्यावर सोलापूरचे अक्षय भडंगे, यश जवळकर व टाळवर



अक्कलकोटचे आदित्य जोशी यांनी सुंदररित्या साथ संगत केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ओंकार पाठक यांनी केले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, विपुल जाधव, रवी मलवे, श्रीकांत मलवे, प्रसाद सोनार, स्वामीनाथ लोणारी, काशिनाथ इंडे, रविराव महिंद्रकर, खंडेराव घाटगे, बाळासाहेब घाटगे, शिवशरण अचलेर, दीपक जरीपटके, मनोहर देगावकर, भीमराव भोसेकर, जयप्रकाश तोळणूरे, श्रीपाद सरदेशमुख, व्यंकटेश पुजारी, महेश मस्कले, लखन गवळी, सिध्दार्थ थंब, समर्थ गडकरी, व्यास, श्वेता शिंदे, सायली पाटील, हेमांगी भावे, अबोली घाटे, देवयानी गाडगीळ, सुरेखा तेली, प्रसाद पाटील आदींसह स्वामी भक्तांनी उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

# शिवसेना भवन, पक्ष निधीसाठी कोर्टात याचिका

## उद्धव ठाकरेंच्या अडचणीत वाढ

सुराज्य/मुंबई

**उद्धव ठाकरे यांच्यांकडून शिवसेनेचं नाव आणि धनुष्यबाण चिन्ह गेल्यानंतर आता शिवसेना भवन, शाखा आणि सर्व बॅंकांमधील पक्षनिधीही हातून जातोय की काय अशी परिस्थिती सध्या ठाकरे गटाची झाली आहे. नुकतीच सुप्रीम कोर्टात याबाबत याचिका दाखल केली आहे.**




केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निकालात शिवसेनेचं नाव आणि धनुष्यबाण चिन्ह हे एकनाथ शिंदे यांच्या गटाला दिले आहे. आता दादरमधील शिवसेना भवन आणि सामना, मार्मिक यांची मालकी कोणाकडे जाणार? असा प्रश्न उपस्थित करण्यात येतोय. शिवसेना गेल्यावर उद्धव ठाकरे यांचा शिवसेना भवनावर अधिकार राहील का, हा प्रश्न आहे. तसेच मुंबईतील २२७ प्रभागांमध्ये असणाऱ्या शाखांचे काय होणार? यावर चर्चा रंगताना दिसून येत आहेत. अशात आता या प्रकरणात आणखी एक मोठी अपडेट येत आहे.

शिवसेना पक्ष कोणाचा याबाबत निवडणूक आयोगाने निर्णय दिला आहे. या निर्णयावर आधारित ॲड. आशिष गिरींकडून ही याचिका दाखल करण्यात आली आहे.

या याचिकेमध्ये शिवसेनेच्या चल अचल संपत्तीवर दावा करण्यात आला आहे. तसंच शिवसेना भवन, शाखा आणि सर्व बॅंकामधील पक्षनिधी शिंदे गटाच्या नेतृत्वाखालील शिवसेनेकडे देण्याची मागणी देखील या याचिकेत करण्यात आली आहे.

शिवसेनेकडे पक्षनिधी आहे. याशिवाय संपत्ती, संस्था, कार्यालयं, शाखा आहेत. त्यावर कोणाचा हक्क याकडे न्यायालय अगदी वेगळ्या प्रकारे पाहतं. शिवसेना पक्ष कुणाचा यावर निवडणूक आयोगाने निर्णय दिला आहे. त्यानुसार शिवसेनेचे बॅंक खातं केवळ शिवसेनेचं असेल, तर त्याचे सर्व अधिकार शिंदे गटाला जातात. त्यामुळे तो पक्षनिधी शिंदे गटाकडे वर्ग करा अशी मागणी या याचिकेतून करण्यात आली आहे.

मी कोणत्याही पक्षाचा कार्यकर्ता नसून एक वकिल आणि मतदार या नात्याने ही याचिका दाखल केली आहे, असं ॲड. आशिष गिरी यांनी सांगितलंय.

दिल्लीतील प्रसारमाध्यमांशी बोलत असताना त्यांनी ही माहिती दिली. तसंच निकाल लागेपर्यंत निधी वापरण्यावर निर्बंध घालण्यात यावा, अशी मागणी देखील त्यांनी याचिकेतून केली आहे.

धनुष्यबाण आणि शिवसेना हे नाव शिंदे गटाकडे गेल्याच्या धक्क्यातून उद्धव ठाकरे अद्याप बाहेर पडले नाहीत तोवर त्यांना आणखी एका मोठा धक्का मिळालाय. त्यामुळे आता या याचिकेवर सुप्रीम कोर्ट काय निर्णय घेणार हे पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.

---

## मुंबई तापली

## कमाल तापमान वाढतच आहे, पुढचे ४ दिवस अधिक उष्णतेचे

सुराज्य/मुंबई

**पूर्वेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे मुंबईच्या कमाल तापमानाचा पारा चढला आहे. मुंबईमध्ये शनिवार आणि रविवारी दोन्ही दिवशी कमाल तापमान ३६ अंश पार झाले होते. या आठवड्यात कमाल तापमान ३८ अंशांपर्यंत जाईल, असा अंदाजही भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. रविवारी वर्तवलेल्या पूर्वानुमानानुसार पुढील चार दिवस कमाल तापमान ३६ अंश किंवा अधिक राहील, अशी शक्यता आहे.**



मुंबईत सांताक्रूझ येथे रविवारी ३६.४ तर कुलाबा येथे ३४.८ अंश सेल्सिअस कमाल तापमान होते. तर कुलाबा येथे ३४.८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. सांताक्रूझ येथील कमाल तापमान सरासरी तापमानापेक्षा २.९ अंशांनी अधिक नोंदवले गेले तर कुलाबा येथील कमाल तापमान २.१ अंशांनी सरासरीहून अधिक नोंदवले गेले. कुलाबा येथील कमाल तापमानात २४ तासांमध्ये १.६ अंशांची वाढ झाली. सांताक्रूझ येथे शनिवारी कमाल तापमान ३६.५ अंश सेल्सिअसवर पोहोचला होता. मंगळवारी हा पारा ३७ तर बुधवारी ३८ अंशांपर्यंत पोहोचू शकेल असा अंदाज आहे. या कालावधीत आभाळ निरभ्र असेल. त्यामुळे सूर्याची किरणे थेट जमिनीपर्यंत पोहोचून हा ताप अधिक जाणवू शकतो अशीही शक्यता आहे.

## फळांचा राजा यंदाही तोऱ्यात

सुराज्य/नाशिक

**अक्षय्य तृतीया जवळ आली की रसरशीत आंब्यांची खवय्यांना ओढ लागते. यंदा बाजारात आंबा दाखल झाला आहे. परंतु अवकाळी पावसामुळे दरवर्षीच्या तुलनेत उत्पादन कमी असल्याने फळांचा राजा यंदाही तोऱ्यात असल्याचे दिसून येत आहे. सध्या बाजारात लालबाग, पायरी, हापूस, केशर हे आंब्याचे वाण दाखल झाले आहेत. परंतु, बाजारात आंब्याच्या किमती आवाक्याबाहेर असल्याने सर्वसामान्यांसाठी अजून तो आंबटच असल्याचे चित्र आहे.**

स्थानिक फळ विक्रेत्यांकडे रत्नागिरी, कोकण, बेंगळुरू अशा विविध ठिकाणांहून आंबा दाखल झाला आहे. काही दिवसांपूर्वी राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे अन्य पिकांसह आंब्याचेही नुकसान झाले होते. त्यामुळे बाजारात यंदा आंबा महागल्याचे चित्र आहे. स्थानिक बाजारपेठेत साधारण महिनाभरापासून आंबा दाखल झाला आहे. बाजारात आंबा १५० ते ८०० रुपयांपर्यंत प्रतिकिलो विक्री होत आहे.



हापूसपाठोपाठ केशरआंबा मोठ्या प्रमाणावर स्थानिक बाजारपेठेत दाखल होत असतो. याशिवाय नीलम, लंगडा, मलगोवा या वाणांच्या प्रजातींची अपेक्षित आवक सध्या तरी नाही. आमरसासाठी गावठी आंब्यालाही मागणी असते, तर गोडांब्यासाठी लागणारा तोतापुरी आंबाही सध्या बाजारपेठेत नाही. लोणच्यासाठी कैरीला मोठी मागणी असते. परंतु, सध्या बाजारपेठेत कैऱ्यांचीही आवक कमी आहे.

### फोटोचा मोह जीवावर बेतला

सुराज्य/पुणे : तरुणाईमध्ये सेल्फी आणि फोटो सेशन करण्याचा मोह वाढल्याचे अनेक व्हिडिओ किंवा फोटो बऱ्याचदा समोर येत असतात. ठाणे जिल्ह्यातील शहापूरमध्ये अशीच एक घटना घडली आहे. शहापूर तालुक्यातील कासगाव नदी येथे फोटो सेशन करण्यासाठी गेलेल्या अठरा वर्षीय तरुणाला पाण्याचा अंदाज न आल्याने प्राण गमवावे लागल्याची घटना समोर आली आहे. करण फर्डे असे पाण्यात बुडून मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

### आयपीएल क्रिकेटवर सट्टा लावणे चांगलेच पडले महागात

सुराज्य/पुणे : इंडियन प्रीमिअर लीगच्या (आयपीएल) क्रिकेट सामन्यावर



सट्टा घेणाऱ्या नऊ सट्टेबाजांना गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवारी रात्री अटक केली. त्यांच्याकडून कम्प्युटर, तीन लॅपटॉप, १८ मोबाइल, ९२ हजारांची रोकड असा पाच लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

## शहाजीबापूंनी अयोध्या का टाळली?

सुराज्य/अयोध्या

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अयोध्या दौरा रविवारी झाला. एका दिवसांत त्यांनी राम लल्लाचे दर्शन, हनुमान गढीवर भाषण, शरयू तीरावरती महाआरती आणि उत्तर प्रदेशातून निघताना मुख्यमंत्री योगी आदिनाथ यांची भेट घेतली. या संपूर्ण दौऱ्यात मंत्रिमंडळातील शिवसेना-भाजपचे अनेक सहकारी आणि शिंदे गटाचे आमदारही उपस्थित होते. मात्र, आता चर्चा सुरु झाली



आहे ती या दौऱ्यात गैरहजर असलेल्या शिंदे गटाच्या चार आमदार आणि चार खासदारांची.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील या अयोध्या दौऱ्यात सहभागी झाले होते. त्यांनी मुख्यमंत्र्यांसोबत रामलल्लांचे दर्शन आणि निर्माणाधीन मंदिराची पाहाणी केली आणि ते त्यांच्या पुढील कार्यक्रमांसाठी रवाना झाले. मुख्यमंत्र्यांच्या अयोध्या दौऱ्यावेळी अनुपस्थित राहिलेल्या खासदार, आमदारांमुळे शिंदे - फडणवीस सरकारमध्ये सर्वकाही आलबेल नाही, अशी चर्चा आता सुरु झाली आहे.

शिवसेना ठाकरे गटाकडूनही या गैरहजेरीवरुन सरकारमध्ये काही तरी गडबड आहे. एक मोठा गट अस्वस्थ आहे, असे म्हटले जाऊ लागले आहे.

## अकोल्यात झाड कोसळून ७ जणांचा मृत्यू

सुराज्य/अकोला

**अकोल्यामधील पारसगावातील मंदिराच्या शेडवर झाड कोसळल्याच्या दुर्घटना प्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून दखल घेण्यात आलीय. मृतांच्या नातेवाईकांना ४ लाखांची मदत जाहीर करण्यात आलीय. तर या दुर्घटनेतील जखमींवर शासकीय खर्चाने उपचार करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिले आहेत. याबाबत मुख्यमंत्र्यांनी महत्त्वाचे आदेश देखील दिले आहेत.**



अकोल्यातील बाळापूर तालुक्यातील पारस गावात रविवारी सायंकाळी बाबूजी महाराज संस्थानामध्ये सायंकाळीची आरती सुरू होती. रविवारी रात्री वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाल्याने मंदिराच्या बाजुलाच असलेले मोठे कडुलिंबाचे झाड अचानक मंदिराच्या छतावर कोसळले. या शेडखाली असलेले ४० ते ५० जण दबले गेले होते.

उन्मळून टिनशेडवर कोसळले. त्यामुळे शेडखाली असलेले ४० ते ५० जण दबले गेले होते. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ अधिकारी आणि पोलीस प्रशासनाने घटनास्थळी पोहोचत बचाव कार्य सुरू केले. तसेच जखमींना तत्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या दुर्घटनेत सात भाविकांचा मृत्यू झाला असून २३ जण जखमी झाले आहेत.

या घटनेची एकनाथ शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाकडून माहिती घेतली. यातील मृतांच्या वारसांना प्रत्येकी ४ लाखांची मदत जाहीर केली आहे. ६० टक्क्यापेक्षा जास्त अपंगत्व आलेल्या भाविकांना दोन लाख ५० हजार, ४० ते ६० टक्के अपंगत्व आलेल्यांना ७४ हजार रुपये मदत देण्यात येईल. तसेच एका आठवड्यापेक्षा जास्त रुग्णालयात असल्यास १६ हजार व एका आठवड्यापेक्षा कमी रुग्णालयात असल्यास पाच हजार ४०० रुपये मदत देण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## स्काय डायव्हिंग करत ५ हजार उंचीवरून उडी

सुराज्य/पुणे

**पुण्याच्या पद्मश्री शीतल महाजन-राणे यांनी पॉवर हँग ग्लायडर मधून स्काय डायव्हिंग करुन नवीन राष्ट्रीय विक्रम रचला आहे. त्यांनी हा विक्रम ५ हजार उंचावरुन उडी मारत नोंदवला आहे. हरियाणामधील पिंजर विमानतळावर एरो क्लब ऑफ इंडिया आयोजित नॅशनल मॉडलिंग फेलोशिप या कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी त्यांनी हा विक्रम केला आहे.**

### पद्मश्री महाजन यांचा विक्रम



पुण्याच्या पद्मश्री शीतल महाजन-राणे यांनी पॉवर हँग ग्लायडरमधून स्काय डायव्हिंग करुन नवीन राष्ट्रीय विक्रम रचला आहे. त्यांनी हा विक्रम ५ हजार उंचावरुन उडी मारत नोंदवला आहे. हरियाणामधील पिंजर विमानतळावर एरो क्लब ऑफ इंडिया आयोजित नॅशनल मॉडलिंग फेलोशिप या कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी त्यांनी हा विक्रम केला आहे.

यावेळी पॉवर हँग ग्लाईडरचे पायलट हे उत्तर प्रदेशचे गोंडा जिल्ह्याचे खासदार कीर्तीवर्धन सिंग होते.

## जिद्द इतकी महान की नशीब बदलणारच

### रस्त्यावर कढी भात विकून उदरनिर्वाह करणाऱ्या जोडप्यांचा व्हिडिओ व्हायरल

सुराज्य/फरिदाबाद

**आयुष्यात अनेक चढ-उतार येत असतात. अनेकदा सर्वकाही सुरळीत सुरू असताना अनपेक्षित घटना घडतात आणि होत्याचं नव्हतं होतं. आपल्यापैकी प्रत्येकाने आयुष्यात कधी ना कधी ही परिस्थिती अनुभवली आहे. अशा वेळी आशा सोडून चालत नाही. पुन्हा सगळं ठीक होईल असा विश्वास ठेवून पुन्हा नव्याने सुरुवात करावी लागते. कित्येकजण काहीही परिस्थिती आली तर हार मानत नाही आणि आपल्या आयुष्यातील संघर्ष करत राहतात. आपल्या आसपास असे अनेक उदाहरण आपण पाहात असतो. अशाच परिस्थितीत अडकलेल्या एका जोडप्याचा व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहे. या व्हिडिओमधील जोडपे कढी-भात आणि राजमा-भात विकताना दिसत आहे. विशेष म्हणजे या जोडप्याच्या मालकीची प्रिंटिंग प्रेस देखील होती जी कोरोना काळात बंद पडली. पण या जोडप्याने हार न मानता रस्त्यावर स्टॉल सुरू केला आहे.**




**स्वयंपाकाची आवड जोपासून निर्माण केला उत्पन्नाचा स्त्रोत**

तुमच्या आयुष्यात अशी परिस्थिती निर्माण होते तेव्हा खूप धैर्याने आणि धाडसाने निर्णय घ्यावे लागतात, विशेषत: तेव्हा जेव्हा तुमचे वय जास्त असते. या जोडप्याने देखील असाच संघर्ष करत आपली स्वयंपाकाची आवड जोपासून स्वत:साठी उत्पन्नाचा स्रोत निर्माण केला आहे. नवीन कौशल्ये शिकणे आणि नवीन कामाच्या बदलांसोबत जुळवून घेणे कठीण असते परंतु त्यांनी या आव्हानांवर मात केली.

**जिद्दीने बदलली स्वत:ची परिस्थिती**

स्वयंपाक ही एक कला आहे जी लोकांना एकत्र आणते आणि या जोडप्याच्या स्वयंपाकाच्या आवडीमुळे त्यांचे जीवन कसे बदलले हे पाहणे आनंददायी आहे. त्यांची गोष्ट एकदा नक्की ऐकली पाहिजे. आपल्या आयुष्याची जबाबदारी घेण्यासाठी आणि ती पूर्ण करण्यासाठी कधीही उशीर होत नाही. असा संदेश हे जोडपे देत आहे. त्यांच्या जिद्दीमुळे त्यांनी आपले आयुष्य बदलले आहे.

**प्रिंटिंग प्रेसचे मालक होते जोडपं**

व्हिडिओमधील व्यक्ती असे सांगत आहे की, मी एक प्रिंटिंग प्रेस चालवत असे, पण लॉकडाऊनच्या काळात ती बंद पडली. त्यानंतर, मी काम करू लागलो, पण आमच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी लागणारा पैसा जास्त होता. म्हणून आम्ही आमचे स्वत:चे काहीतरी सुरू करण्याचा निर्णय घेतला. कारण आम्हाला स्वयंपाकबाबत माहित आहे.

व्हिडिओमध्ये, तो माणूस रस्त्याच्या कडेला असलेल्या स्टॉलवर आपला राजमा भात आणि कढी भात कसे सर्व्ह करतो हे दाखवताना दिसत आहे. यासोबत मुळा आणि हिरव्या पुदीनाची चटणी दिली जात आहे. हे जोडपे त्यांचे दोन्ही मुख्य पदार्थ, राजमा आणि कढी भात, ४० रुपयांना प्रत्येकी विकतात. जतिन सिंग यांनी कमेंटमध्ये त्यांच्या स्टॉलचा पत्ता देखील दिला आहे जो गेट क्रमांक ५ फरीदाबाद जवळ ग्रीनफिल्ड कॉलनी असा आहे. आतापर्यंत ६ लाखांपेक्षा जास्त लोकांनी हा व्हिडिओ पाहिला असून २६ हजारपेक्षा जास्त जणांना तो आवडला आहे आणि त्यावर ७५ च्या आसपास प्रतिक्रिया मिळाल्या आहेत. ही गोष्ट सर्वांसाठी हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी होती

### शिवीगाळ करणारा उपनिरीक्षक निलंबित

सुराज्य/पुणे : अनैतिक प्रेमसंबंधातून प्रेयसीच्या घरात घुसून तिच्या पतीसह कुटुंबीयांना शिवीगाळ करणे आणि पिस्तुलाचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एका पोलीस उपनिरीक्षकावर कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर उपनिरीक्षकाचे पोलीस दलातून निलंबन करण्यात आले आहे.

प्रवीण नागेश जर्दे असे गुन्हा दाखल झालेल्या उपनिरीक्षकाचे नाव आहे.

## बेरोजगारीचा प्रश्न असताना पदवीचे काय घेऊन बसलात?

### मोदींचे नाव न घेता शरद पवारांचे सूचक वक्तव्य

सुराज्य/मुंबई

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डिग्रीवरून सध्या राजकारण पेटलं आहे. याची सुरूवात झाली ती दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कोर्टाने ठोठावलेल्या २५ हजारांच्या दंडाच्या बातमीमुळे. माहितीच्या अधिकारात अरविंद केजरीवाल यांनी ही माहिती विचारली होती. जी मिळाली नाही, त्यानंतर केजरीवाल माहिती आयुक्तांकडे गेले. हे प्रकरण सुरतच्या कोर्टात गेलं. ज्यानंतर कोर्टाने केजरीवाल यांना दंड ठोठावला. आता या प्रकरणावर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी भाष्य केलं आहे. देशात बेरोजगारीचा प्रश्न असताना डिग्रीचं कसलं घेऊन बसलात? असं शरद पवारांनी म्हटलं आहे.**

आपल्या देशातल्या लोकांसमोर डिग्रीचा प्रश्न आहे का? तुमची डिग्री काय? माझी डिग्री काय? त्यांची डिग्री




काय? हे जास्त महत्त्वाचं आहे का? बेकारी, महागाई, कायदा सुव्यवस्था असे अनेक प्रश्न आहे. त्याबाबत या राज्य आणि केंद्र सरकारने प्रयत्न केले पाहिजेत असं मत शरद पवार यांनी मांडलं आहे.

एकीकडे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी डिग्री हा महत्त्वाचा प्रश्न नाही असं म्हटलेलं असताना संजय राऊत यांनी मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या डिग्रीची मागणी केली आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या डिग्रीच्या प्रश्नाबाबत महाविकास आघाडीत मतमतांतरे दिसून येत आहेत.

# निवडणुका लांबल्याने हौशी गायब; माजी नगरसेवक मात्र सक्रिय

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेची मुदत संपून १३ महिने झाले मात्र अद्यापही निवडणुका जाहीर झाल्या नाहीत. महापालिकेवर वर्षभरापासून प्रशासक असून निवडणुका कधी लागणार हे अद्यापही निश्चित नाही. उन्हाळ्यात निवडणुका होतील या अंदाजाने हौशी, इच्छुक सक्रिय झाले होते मात्र आता निवडणुकांचा अंदाजच येत नसल्याने ते गायब झाले आहेत. परंतु, माजी नगरसेवक सक्रिय होत असून निवडणुका होतील, असेच म्हणत प्रभागात लक्ष देताना दिसत आहेत.



**कायदेशीर अडथळे दूर होणे महत्त्वाचे :** राज्यातील महानगरपालिका निवडणुका न होण्यामागील प्रमुख कारण म्हणजे कायदेशीर अडथळे आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणाचा मुद्दा हा प्रमुख अडथळा आहे. याशिवाय, प्रभाग रचनेच्या मुद्यावरुन सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये वाद आहेत. शिंदे फडणवीस सरकार हे चार सदस्यीय प्रभाग रचनेसाठी आग्रही आहे. तर महाविकास आघाडीचा या प्रभाग रचनेला विरोध आहे. त्यामुळे आता सर्वोच्च न्यायालयाने महानगरपालिका निवडणुकांना हिरवा कंदील दाखवल्यानंतर शिंदे फडणवीस सरकारकडून पुन्हा नव्याने प्रभाग रचनेचे आदेश दिले जाऊ शकतात. त्यानंतर शिफारसी, हरकती आणि प्रभाग निश्चिती अशी सगळी प्रक्रिया पुन्हा नव्याने राबवली जाईल. ही सगळी प्रक्रिया पावसाळ्याच्या काळात पार पडून ऑक्टोबर महिन्यात या निवडणुका होतील अशी शक्यता आहे.

**सुनावणी तीन आठवडे पुढे ढकलली :** गेल्या आठ महिन्यांपासून ओबीसींचे राजकीय आरक्षण आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसंदर्भात सुनावणी सातत्याने लांबणीवर पडत आहे. मागील आठ महिन्यांपासून या प्रकरणावर कोणतीही सुनावणी झालेली नाही. सोमवारच्या कामकाजात या प्रकरणाचा समावेश करण्यात आला होता. हे प्रकरण आजच्या कामकाजात ३९ नंबरवर सुनावणीसाठी ठेवण्यात आले होते. मात्र, न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी तीन आठवडे पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आता पावसाळ्यापूर्वी या निवडणुका होण्याची शक्यता दुरावली आहे.

ओबीसी आरक्षण, जुनी प्रभाग रचना बदलणे यासह विविध कारणाने सोलापूरसह संपूर्ण राज्यातील महापालिका निवडणुका लांबल्या आहेत. मार्चमध्ये निवडणूक लागण्याची शक्यता वर्तवली जात होती मात्र, पुन्हा निराशाच आली आहे.

शहरात आजच्या घडीला पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. त्यामुळे नागरिकांची ओरड होत आहे. अशा परिस्थितीत माजी नगरसेवक सक्रिय होऊन लोकांच्या अडीअडचणी सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत. वारंवार पालिका आयुक्तांना भेटणे, पाण्याबाबत त्यांना जाब विचारणे, अधिकाऱ्यांना धारेवर धरणे अशी कामे माजी नगरसेवक करताना दिसत आहेत. दुसरीकडे निवडणुका आज होतील उद्या होतील असे म्हणत कार्यकर्त्यांवर वर्षभर पैसा उडवणारे हौशी मात्र गायब झाल्याचे दिसत आहेत.

राज्यामध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी यांच्यासह उद्धव ठाकरे गट यांची महाआघाडी आहे. ही महाआघाडी सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत कायम राहणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सध्या शहरात काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये अंतर्गत धुसफूस सुरू आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीत हे दोन्ही पक्ष एकत्र येतील का नाही यावर शंका व्यक्त केली जात आहे. काँग्रेसमध्ये आमदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तसेच सध्या महेश कोठे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीमध्ये इच्छुकांची संख्या दिवसागणिक वाढत आहे. त्यामुळे जागावाटपावरून या आघाडीमध्ये बिघाडी होण्याची शक्यता आतापासूनच वर्तवण्यात येत आहे. दुसरीकडे शिवसेनेमध्ये दोन गट पडल्यामुळे उद्धव ठाकरे गट सध्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षाशी आघाडी करून घेण्याच्या स्थितीत आहे.

इकडे राज्यात भाजप आणि शिवसेना यांचे सरकार आहे या दोन्ही पक्षांनी सर्वच निवडणुका एकत्रित लढवण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे सोलापुरात भाजप शिवसेनेची युती होणार का आणि झाले तरी कोणत्या फॉर्म्युल्यानुसार होणार याची उत्सुकता दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांना लागली आहे.

सध्याची परिस्थिती पाहता शिवसेनेपेक्षा भाजपची ताकद जास्त आहे. त्यामुळे भाजप सेनेला किती जागा सोडणार हेही महत्त्वाचे ठरणार आहे.

खास करून शिवसेनेमध्ये सध्याचे इच्छुक शहर उत्तर मध्ये जास्त आहेत. शहर उत्तर हा आमदार विजयकुमार देशमुख यांचा गड मानला जातो. त्यामुळे महापालिका निवडणुकीत जर भाजप आणि सेनेची युती झाली तर विजयकुमार देशमुख यांची कसोटी लागणार हे निश्चित.



## सोलापूर जिल्हा परिषदेचे उपक्रम राज्याला मार्गदर्शक : केसरकर

**सोलापूर :** सोलापूर जिल्हा परिषदेने शिक्षण विभागात राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती सोमवारी राज्याचे शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांनी जाणून घेतली. सोलापूर जिल्हा परिषदेने शिक्षण विभागात केलेले आमूलाग्र बदल राज्यास मार्गदर्शक आहेत, असे मत त्यांनी व्यक्त केले. या उपक्रमाबद्दल सिईओ दिलीप स्वामी यांचे कौतूकही केले.

दिलीप स्वामी यांनी पंढरपूर येथे शासकीय विश्रामधाम येथे दीपक केसरकर यांची भेट घेऊन त्यांचे श्री विठ्ठल रूक्मिणीची मूर्ती देऊन स्वागत केले. याप्रसंगी शिक्षण विभागाचे उपसंचालक उकिरडे, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा माध्यमिक विभागाचे प्रभारी शिक्षणाधिकारी जावेद शेख, शिक्षणाधिकारी संजय जावीर, पंढरपूर चे गट शिक्षणाधिकारी नाळे, याप्रसंगी प्रमुख उपस्थित होते. स्वामी यांनी सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये राबविलेल्या विविध उपक्रमाची माहिती केसरकर यांना दिली. तात्काळ मंत्रालयात येऊन या उपक्रमाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण परिषदेचे आयोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. राज्यातील सर्व सिईओ शिक्षण परिषदे मध्ये सहभागी होणार आहेत.

**स्वामी यांना सादरीकरणाची संधी देणार : केसरकर**

लोकसहभाग व लोकवर्गणीतून शिक्षण विभागात बदल करता येतात याचे मूर्तीमंत उदाहरण सोलापूर जिल्हा परिषदेचे आहे. लिडरशिप चांगली असली कि त्याचे परिणाम व फलनिष्पत्ती चांगली होते. सायकल बँक व दशसुत्री उपक्रम व स्वच्छ व सुंदर शाळा हे तीन उपक्रम प्रायोगिक तत्वावर राज्यात राबविण्यासाठी सिईओ दिलीप स्वामी यांना सादरीकरणाची संधी देणार असल्याचे शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांनी सांगितले.

## मिनी गोल्डन गँग सक्रिय झाल्याने तालुक्यातील सहकार क्षेत्राच्या निवडणुका लागल्या : सिद्रामप्पा पाटील

**अक्कलकोट :** स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना, अक्कलकोट व दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक लावण्या करिता मिनी गोल्डन गँग' सक्रिय झाल्यानेच निवडणूक लागलेली असून, शेतकऱ्यांच्या मंदिराची निवडणूक लावणाऱ्यांना हद्दपार करा अशी भीम गर्जना माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनी आवाहन केले आहेत.



सोमवारी प्रमिला पार्क येथील लक्ष्मी नम: या निवासस्थांनी साखर कारखाना, व बाजार समिती निवडणूकींच्या अनुषंगाने साखर कारखाना सभासद, ग्रामपंचायत सदस्य व सहकारी संस्थेचे संचालक यांच्या करिता मतदार संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी सिद्रामप्पा पाटील हे बोलत होते. दरम्यान श्री स्वामी समर्थांचे प्रतिमेचे पूजन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वामीराव पाटील, विश्वनाथ भरमशेट्टी, बसलिंगप्पा खेडगी, अप्पू परमशेट्टी, सिध्दप्पा गड्डी, अप्पासाहेब बिराजदार, जयशेखर पाटील, संजीवकुमार पाटील, अप्पासाहेब पाटील, सुनील बिराजदार, गिरमल गंगोडा, भिमाशंकर धोत्री, शिवपुत्र धानशेट्टी, दिलीपराव पाटील, महादेवराव पाटील, बाबूशा करपे, डॉ. शिवशरण काळे, शिवशरण जोजन, राजेंद्र बंदिछोडे आदीजण उपस्थित होते.

सिद्रामप्पा पाटील म्हणाले की, गत बाजार समितीच्या सभापती व संचालकांच्या विरोधात चुकींची माहिती पसरवली जात आहे. शेतकऱ्यांच्या हितार्थ संचालक मंडळ कार्यरत होते. पुढे देखील राहिल. अक्कलकोट व दुधनी बाजार समितीवर भाजपाचा झेंडा फडकविण्यासाठी सोसायटी संचालक, ग्रामपंचायत सदस्य, व्यापारी, हमाल-तोलार मतदारांनी सज्ज व्हावेत. विकासासाठी सतत कार्यरत असणारे नेतृत्व म्हणून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या व माझ्या नेतृत्वाखाली सहकारातील या निवडणूक होत आहेत. तरी या तिन्ही संस्थेवर भाजपाचा झेंडा फडकविण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज रहावे.

आ.कल्याणशेट्टी पुढे बोलताना म्हणाले की, अक्कलकोट बाजार समिती व कारखान्याची निवडणूक विरोधकांनी लावून फायरिंग सेफ करण्याचा प्रयत्न केला आहे. युध्दाच्या आगोदर करण्यात येणारी ही क्रिया आहे. या माध्यमातून दुधनी बाजार समिती ही विरोधक पुन्हा आपल्या ताब्यात घेण्याची मनसुबे आहेत. ही उधळण्यासाठी शेतकरी व कार्यकर्त्यांनी गाफील न राहता भाजपचा झेंडा फडकविण्यासाठी सजग रहावे. संजीवकुमार पाटील यांनी बाजार समितीचा सभापती म्हणून शेतकरी व व्यापारी, हमाल-तोलार यांच्या हितार्थ केलेल्या कामाबाबत माहिती सांगून विरोधकांनी केलेले आरोप म्हणजे नाचता येईना आंगण वाकडे असे असल्याचे सांगितले. यावेळी पुढे बोलतना ठाकरे गटाचे सोपान निकते यांनी सिद्रामप्पा पाटील व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या तिन्ही संस्थेच्या निवडणूकीत त्यांनी देतील त्या उमेदवारांना विजय करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी धनराज बिराजदार, सुधीर मचाले, सिध्दाराम बिराजदार, दिलीपराव शावरी, गुणवंत धर्मसाले, संजीव पाटील, अभिजीत सवळी, स्वप्नील बिराजदार, नागनाथ व्हनमुर्गे, गुरू पाटील, शिवानंद पेडसंगे, मल्लिनात ढब्बे, मलकण्णा जनगोंडा, बसवराज कलशेट्टी, भीमाशंकर विजापुरे, अप्पाशा किवडे, अशोक वर्दे, बाबासाहेब पाटील, श्रीमंत मनगुंदी, महादेव रोडगे, श्रीमंत कुंटोजी, बाबू कॅरु, लक्ष्मीबाई पोमाजी, मल्लिनाथ उणदे, शेकप्पा कलघुटगे, महेश धर्मसाले, गोटू मंगरूळे, महादेव महाजन, श्रीशैल मंगरूळे, प्रकाश पोमाजी, मल्लिनाथ भासगी, राहूल काळे यांच्यासह साखर कारखाना सभसाद, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी, पंचकमेटी अध्यक्ष आदी उपस्थित होते. प्रस्ताविक व सूत्रसंचलन मल्लिनाथ दुलंगे यांनी केले. तर आभार भिमाशंकर विजापुरे यांनी मानले.

### कृषी विभागाचा प्राथमिक अहवाल

## अवकाळी पावसाने २६ गावातील ११९.४ हेक्टर क्षेत्र बाधित

**▸ पंचनामे करण्याचे पालकमंत्र्यांचे आदेश**

सुराज्य सोलापूर

जिल्ह्यात ७ ते ९ एप्रिल या कालावधीत अवकाळी पाऊस, गारपीट व वादळी वाऱ्यामुळे २६ गावे बाधित झाली आहेत. ११९.४ हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याचा कृषी विभागाने प्राथमिक अहवाल दिला आहे. तरी बाधित क्षेत्राचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश राज्याचे महसूल, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले

माळशिरस, मोहोळ, बार्शी, करमाळा, पंढरपूर आणि सांगोला तालुक्यात नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल आहे. प्राथमिक अहवालानुसार २६ गावातील एकूण बाधित शेतकरी संख्या १५६ आहेत. या शेतकऱ्यांच्या मका, पपई, बाजरी, द्राक्षे, आंबा, केळी, दोडका, टोमॅटो ही पिके नुकसानग्रस्त झाली आहेत. कृषि विभागाने सादर केलेल्या प्राथमिक अहवालानुसार तालुका निहाय बाधित गावांची संख्या बाधित क्षेत्र आणि बाधित शेतकऱ्यांची जाहीर केली आहे.



त्यामध्ये माळशिरस मध्ये १४ गावे ११६ शेतकऱ्यांची ८८ हेक्टर, मोहोळ तालुक्यातील २ गावा मधिल २७ शेतकऱ्यांची २० हेक्टर, पंढरपूरातील २ गावातील पाच शेतकऱ्यांचे ३.६० हेक्टर सांगोल्यातील एकच शेतकऱ्यांचे ३.६० हेक्टर तर बार्शीतील ५ गावातील पाच शेतकऱ्यांचे ३ हेक्टर करमाळा मधिल दोन गावातील दोन शेतकऱ्यांचे १.२० हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. शासन संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी असून, संबंधित यंत्रणांनी तातडीने कामाला लागावे व सविस्तर अहवाल तयार करावा. नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करावेत असे पालकमंत्री विखे पाटील यांनी दिले आहेत.




## शेळगी येथे दोन गटात हाणामारी १८ जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर :** किरकोळ कारणावरून शेळगी मित्र नगर येथे दोन गटात हाणामारी झाली. ही घटना ९ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी दोन्ही गटातील १८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हैदर अब्दूल रहमान फुलारी (वय-४३,रा.मित्र नगर, शेळगी) अनिस फुलारी शाहिद फुलारी हुसेन माशाळकर सादिक फुलारी असे सर्वजण मिळून दुकानात काम करत होते. त्यावेळी दादा उर्फ जेडू सर्वगोड,समीर मुक्तावर शेख,पिंटू भुजंग कांबळे शाहरुख मगरुमखाने, कृष्णा उबाळे, आकाश शितोळे मशाक तांबोळी यांच्यासह इतर सात अनोळखी इसमानी हैदर याच्या दुकानात येऊन आदित्य चौगुले हा वेल्डिंगची केबल मागण्यासाठी आला शिवीगाळ केली असे समजून हैदर व त्याचा मुलाला चाकूने ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे.तसेच इतर लोकांनी लोखंडी रॉड मारून गंभीररित्या जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

याप्रकरणी दादा उर्फ जेडु सर्वगोड, समीर मुक्तावर शेख, पिंटू भुजंग कांबळे, कृष्णा उबाळे, आकाश शितोळे, मशाक तांबोळी यांच्यासह इतर अनोळखी सात इसमाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोसई. ताकभाते हे करीत आहेत. दुसऱ्या घटनेत समीर मुक्तावर शेख (वय-२२, रा.मित्र नगर, शेळगी) याने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार त्याला हैदर फुलारी, अनिस हैदर फुलारी, शाहिद अनिस फुलारी, अहमद हुसेन माशाळ (सर्व.रा.मित्र नगर, शेळगी) यांनी मारहाण केली. त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पो.हे.कॉ. नाईकवाडी हे करीत आहेत.

## डॉक्टरने महिलेच्या डोक्यात घातली खुर्ची

**सोलापूर :** तू कामावर नाही आली तर तुला खल्लास करतो असे म्हणत शिवीगाळ करत डॉक्टरने महिलेच्या डोक्यात प्लास्टिकची खुर्ची घालून जखमी केल्याची घटना दि.८ एप्रिल रोजी रात्री आठच्या दरम्यान घडली.

याप्रकरणी गीता अरविंद भाकरे यांनी (रा.देशमुख पाटील वस्ती, आमराई) दिलेल्या फिर्यादीवरून डॉक्टर विजयकुमार इंगळे व त्यांची डॉ.पत्नी दीपा इंगळे (दोघे. रा.अभिमानश्री नगर,सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. गीता व उमा असे दोघेजण मिळून डॉक्टर इंगळे यांच्या घरी गेल्या होत्या. त्यावेळी गीता यांनी डॉ. इंगळे यांना तुम्ही माझे जावई यांना फोन करून माझ्या कामाबद्दल का बोललात असे विचारले. इंगळे यांनी गीता यांना उमा ही कामावर न आल्याने मी तुमच्या जावई यांना फोन केला होता, तुम्ही आता कामावर येणार आहात की नाही ते सांगा असे म्हणाले.त्यावेळी उमा यांनी डॉ. इंगळे व त्यांची पत्नी डॉ.दिपा यांना ती कामावर येणार नसल्याचे सांगितले. त्यावेळी डॉक्टर इंगळे व त्यांची पत्नी यांनी उमा यांना घराबाहेर पाठवून घराचा दरवाजा आतून लावून गीता यांच्याशी हुज्जत घातली शिवीगाळ करून प्लास्टिकची खुर्ची उचलून डोक्यात घालत खल्लास करतो असे म्हणून धमकी दिली. पुढील तपास पोलीस करीत आहे.

## खा.महाडिक यांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

**कोल्हापूर-सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वाच्या रस्त्यांबाबत केली मागणी**



**मोहोळ :** भाजपचे राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिक यांनी नवी दिल्ली येथे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. भाजपकडून राज्यसभेवर निवड झाल्याबद्दल खासदार महाडिक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विशेष आभार मानले.

पक्षाच्या संघटन वाढीसाठी तसेच राज्यसभेचे सदस्य म्हणून सर्वोत्तम योगदान देण्याचे अभिवचन खासदार महाडीक यांनी यावेळी पंतप्रधान मोदी यांना दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही महाडिक यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी महाडिक यांच्या पत्नी अरुंधती महाडिक, सुपुत्र पृथ्वीराज महाडिक, विश्वराज महाडिक, कृष्णराज तसेच स्नुषा वैष्णवी आणि नातू चिरंजीव अमरेंद्र आदी उपस्थित होते. खा. महाडिक यांनी मोदी यांना यावेळी एक निवेदन दिले. यामध्ये कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यातील काही महत्त्वाच्या रस्त्यांबाबत लक्ष वेधले आहे. रत्नागिरीला जाणारा महामार्ग कोल्हापूर शहरातून जातो. त्यामुळे शहरात सुमारे ७ किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल उभारावा, वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी शहराबाहेरून सुमारे ६५ किलोमीटर लांबीचा नवा रिंग रोड तयार करावा आणि या दोन्ही कामांची जबाबदारी राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे द्यावी अशी विनंती खा. महाडिक यांनी केली आहे. तसेच सातारा, पंढरपूर, कुरुल , कामती हा सोलापूर जिल्ह्यातील रस्ता पर्यटक आणि भाविकांसाठी महत्वाचा आहे. महाबळेश्वर, पंढरपूर, तुळजापूर आणि अक्कलकोट या तीर्थक्षेत्रांना जाण्यासाठी या रस्त्याचा वापर होतो. शिवाय १५ साखर कारखान्यांच्या ऊस वाहतूक वाहनांची याच रस्त्यावरून वर्दळ असते. त्यामुळे हा रस्ता भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे वर्ग करावा आणि राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ मध्ये समाविष्ट करावा अशीही मागणी केली. मागण्यांबद्दल नरेंद्र मोदी यांनी सकारात्मकता दर्शवल्याचे खा.महाडिक यांनी सांगितले.